
बैल पोळ्याच्या सर्व शेतकरी बांधवांना हार्दिक शुभेच्छा!

पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैंनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला • वर्ष १६ • अंक ६५ • गुरूवार, दि. १० सप्टेंबर २०२६ • मूल्य ५ • पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 | Postal Regn. No. AKL DN/283/2024-26 | Web. https://epaper.citynewssuperfast.com


# महावितरणाच्या IPO साठी अधिकाऱ्यांना शॉक!

## वरिष्ठ अधिकाऱ्यांचा अपमान, कामगार संघटनांची चुप्पी

प्रतिनिधी १० ऑगस्ट

**अकोला : राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील महावितरण लवकरच आपला प्राथमिक भागभांडवल अर्ज म्हणजेच आयपीओ बाजारात आणण्याच्या तयारीत आहे. मात्र, कंपनीचे आर्थिक चित्र उज्वल दाखवण्याच्या आणि कागदपत्रे पूर्ण करण्याच्या या शर्यतीत क्षेत्रीय पातळीवरील वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा कमालीचा छळ सुरू असल्याचे चित्र समोर येत आहे. आयपीओच्या पूर्वतयारीसाठी संपत्तीची नोंद, थकबाकी वसुली आणि वीज चोरी रोखण्याच्या नावाखाली वरिष्ठ संचालकांकडून अधिकाऱ्यांना कमालीची अपमानास्पद वागणूक दिली जात आहे.**




### संचालकांकडून झापाझुपी; अधिकाऱ्यांची झोप उडाली

महावितरणचा आयपीओ वेळेत आणण्यासाठी मुंबई आणि वरिष्ठ मुख्यालयातील संचालकांकडून दररोज व्हिडियो कॉन्फरन्सिंगद्वारे आढावा बैठका घेतल्या जात आहेत. अकोल्यातील ही एक आढावा बैठक नुकतीच झाली. या बैठकीत इज ऑफ लिव्हिंग च्या नावाखाली झापाझुपीचा एक मात्र प्रयोग राबविला गेला. या बैठकांमध्ये कामाचा आढावा घेताना वरिष्ठ संचालकांकडून ज्येष्ठ व अनुभवी अधिकाऱ्यांवर अत्यंत हलक्या दर्जाची भाषा वापरून 'झापाझुपी' केली गेली. महावितरण कंपनीला दिलेल्या सेवेचा वयाचा कुठलाही विचार न करता एकेरी भाषेत वरिष्ठ अधिकाऱ्यांना दमदाटी करण्यात आल्याची माहिती आहे. 'दिलेले टार्गेट पूर्ण करा, नाहीतर घरचा रस्ता धरा,' अशा धमक्यांमुळे अनेक अधिकाऱ्यांचे मानसिक आरोग्य खालावले असून त्यांची झोप उडाली आहे.

### स्मार्ट मीटर सक्तीने लाईन स्टाफ वैतागला

एकिकडे स्मार्ट मीटरच्या कार्यपद्धतीवर आणि संभाव्य वाढीव बिलांवरून जनता, शेतकरी आणि विविध सामाजिक संघटना रस्त्यावर उतरून तीव्र विरोध करत आहेत. दुसरीकडे, हेच स्मार्ट मीटर कोणत्याही परिस्थितीत बसवण्याची सक्ती वरिष्ठ पातळीवरून केली जात आहे. जनता आणि वरिष्ठांच्या दुहेरी कात्रीत लाईन स्टाफ व कनिष्ठ अधिकारी पुरते भरडले जात असून ते तीव्र वैतागले आहेत. सामान्य जनतेच्या स्मार्ट मीटरला विरोध असून त्याच वेळी १५ दिवसात स्मार्ट मिटर लावा असा आदेश महावितरण चे संचालक देत असून याचा अनावश्यक दबाव वाढला आहे.

### पाऊस नाही, शेतकरी अडचणीत; तरीही वीज चोरीचे टार्गेट वाढवले

यंदाच्या हंगामात पावसाने पाठ फिरवल्यामुळे विभागासह राज्यभरातील शेतकरी वर्ग आधीच संकटात सापडला आहे. पीक वाचवण्यासाठी शेतकऱ्यांना विजेची तीव्र गरज आहे. मात्र, अशा भीषण परिस्थितीतही महावितरण प्रशासनाने वसुली आणि वीज चोरी पकडण्याचे अवास्तव टार्गेट अधिकाऱ्यांना दिले आहे. दररोज वीज चोरीचे गुन्हे दाखल करण्याचे आदेश देण्यात आल्यामुळे क्षेत्रीय अधिकारी व कर्मचारी संतप्त झाले आहेत. फ्लाईंग स्क्वॉड असो की वरिष्ठ अधिकारी यांना वीज चोरीचे टार्गेट दिले आहे. ऐन दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांवर गुन्हे दाखल करणे आणि थकीत बिलांसाठी जोडणी कापणे यामुळे स्थानिक पातळीवर कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत आहे. अशा परिस्थितीत मुंबई स्थित वरिष्ठांचे प्रेशरने अधिकाऱ्यांचे बीपी वाढले आहे.

### 'एस्मा'मुळे संघटना गप्प; व्हिआरएसचा मार्ग

महावितरणमधील या हुकूमशाही कारभाराविरोधात आणि अपमानास्पद वागणुकीविरोधात आवाज उठवणारा कर्मचारी वर्ग हतबल झाला आहे. कर्मचाऱ्यांवर 'एस्मा' सारख्या कडक अत्यावश्यक सेवा कायद्याची टांगती तलवार ठेवल्यामुळे कामगार संघटनांचे हात बांधले गेले आहेत आणि त्यांनी मौन बाळगले आहे. एक ही कामगार संघटना काय अधिकारी रोजच्या वेगवेगळ्या परिपत्रकामुळे गप्प गुमान आहेत. महावितरण कंपनीने व्हिआरएस घोषित केल्यास शेकडो अभियंता, लाईन स्टाफ सोडून जाण्याच्या मनस्थितीत आहे याचा अंदाज महावितरणाच्या प्रकाशगड येथील संचालकांना नसावा. त्यानंतर कंपनी कोणाच्या घशात घातली जाते याकडे सर्वांचे लक्ष आहे. सततची थकीत वसुली, वीज चोरीच्या तपासाचे अवास्तव दडपण, जनतेचा रोष आणि रोज होणारा मानहानीकारक अपमान या सर्व मानसिक त्रासाला कंटाळून आता महावितरणमधील अनेक ज्येष्ठ व अनुभवी अधिकारी स्वेच्छानिवृत्ती घेण्याच्या मनःस्थितीत आले आहेत. कंपनीची पत सुधारण्यासाठी सुरू असलेला हा अतिरेक महावितरणच्या मूळ प्रशासकीय व्यवस्थेला सुरुंग लावणारा ठरत आहे.

## »थोडक्यात

### २४ तासांत हवामान बदलणार!

मुंबई : ऐन पावसाळ्यात महाराष्ट्रातून पाऊस गायब झाला आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील शेतकरी चिंतेच्या गर्तेत सापडले आहेत. पुढील २ दिवसात राज्यातील हवामानात मोठा उलटफेर होण्याची शक्यता आहे. १२ सप्टेंबरनंतर कोकणातील हवामानात बदल होण्याची शक्यता असून बहुतांश ठिकाणी चांगला पाऊस होण्याचा अंदाज हवामान विभागानं व्यक्त केला आहे. विदर्भात सध्या बहुतांश ठिकाणी हवामान कोरडं आहे. काही भागांत उष्ण आणि ढगाळ वातावरण पाहायला मिळत आहे. मात्र, उद्यापासून हवामानात बदल होण्याची शक्यता आहे.

### शंभर आमदारांचे तिकिट धोक्यात!

नवी दिल्ली : सहा महिन्यांवर आलेल्या उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुकीत भाजपसमोर योगी आदित्यनाथ यांच्या नेतृत्वाखाली सलग तिसऱ्यांदा सत्ता राखण्याचे आव्हान आहे. राज्यातील ४०३ मतदारसंघांतील राजकीय स्थिती, आमदारांची कामगिरी, स्थानिक नाराजी, सामाजिक समीकरणे आणि संघटनात्मक अहवालांआधारे उमेदवार निवड होणार आहे. या प्रक्रियेत शंभराहून अधिक विद्यमान आमदारांचे तिकिट धोक्यात येऊ शकते, अशी चर्चा पक्षात आहे.

### कुख्यात अबू सालेमला 'सर्वोच्च' दणका!

दिल्ली : १९९३ च्या मुंबई साखळी बॉम्बस्फोट आणि बांधकाम व्यावसायिक प्रदीप जैन यांच्या हत्येप्रकरणी जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या गँगस्टर अबू सालेम संदर्भात एक मोठी बातमी समोर आली आहे. १९९३ बॉम्बस्फोट प्रकरणातील आरोपी आणि गँगस्टर अबू सालेमला सुप्रीम कोर्टाने मोठा झटका दिला. १९९३ मुंबई बॉम्बस्फोटातील दोषी अबू सालेमची २५ वर्षांचा कारावास पूर्ण झाल्याच्या आधारावर सुटकेची मागणी करणारी याचिका कोर्टाने फेटाळली आहे. पोर्तुगालमधून भारतात आणताना २५ वर्षांपेक्षा अधिक कारावास न देण्याचे भारत सरकारने आश्वासन दिले होते. अंडरट्रायल काळ, दोषसिद्धीनंतरचा कारावास आणि चांगल्या वर्तणुकीची रिमिशन मोजल्यास ३१ मार्च २०२५ रोजी २५ वर्षे पूर्ण झाल्याचा सालेमचा दावा होता.

# ...तर बापट यांनी जंगलात जावं!

प्रतिनिधी १० ऑगस्ट

**पुणे** : विद्यानंद बापट यांनी नोटीसला उत्तर दिलं नाही तर आम्ही पुण्याचे पोलीस आयुक्त यांची भेट घेऊन आपण यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी करणार आहोत, अशी माहिती मुंबई उच्च न्यायालयाचे वकील ॲड. प्रदीप नाईक यांनी दिली आहे. विद्यानंद बापट यांनी केलेल्या कथित अवमानकारक वक्तव्याच्या विरोधात ॲड. प्रदीप नाईक यांनी त्यांना कायदेशीर नोटीस बजावली आहे. बापट नास्तिक असो किंवा कोणी असो पण ते त्यांच्या उंबऱ्याच्या आतमध्ये, संविधानिक अधिकाराच्यानुसार बापट जेव्हा बाहेर येतात तेव्हा त्यांनी सर्वांच्या इच्छा आणि अपेक्षा संभाळणे गरजेचे आहे. इतका त्रास होत असेल तर बापट यांनी अमेझॉनच्या जंगलात जाऊन राहावं, तो नास्तिकपणा त्यांनी तिथल्या प्राण्यांवर दाखवावा असे मत नाईक यांनी व्यक्त केलं आहे.

नोटीसचे स्पष्टीकरण न दिल्यास व कृती पुढे चालू ठेवल्यास, व्हिडिओ, इलेक्ट्रॉनिक पुरावे इतर सामग्रीच्या आधारे सायबर पोलिस, संबंधित पोलिस अधिकारी तसेच न्यायालयात भारतीय न्याय संहितेतील संबंधित कलमांनुसार : फौजदारी तक्रार दाखल करण्याचा प्रदीप नाईक यांनी इशारा दिला असून या पुढील कायदेशीर प्रक्रियेला विद्यानंद बापट जबाबदार राहतील, असेही नोटीसमध्ये नमूद करण्यात आले आहे. आक्षेपार्ह वक्तव्याचा सोशल मीडियाव प्रसार होत असल्यास थांबवावे, मेटाडाटा व इतर इलेक्ट्रानिक पुरावे नष्ट अथवा त्याच्याशी छेडछाड करून नये तर सुरक्षित जतन करावेत असेही नोटीसमध्ये म्हटले आहे.

# लंडनच्या हाऊस ऑफ लॉर्ड्समध्ये 'जय महाराष्ट्र'चा नारा

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना 'कॉमनवेल्थ लीडरशिप' पुरस्कार

प्रतिनिधी १० ऑगस्ट

**लंडन:** ब्रिटनच्या ऐतिहासिक संसदेतील वरिष्ठ सभागृह 'हाऊस ऑफ लॉर्ड्स'मध्ये महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आणि शिवसेना मुख्यनेते एकनाथ शिंदे यांच्या रूपाने मराठी भाषेचा आणि महाराष्ट्राचा गौरव झाला. त्यांना ब्रिटनमध्ये प्रतिष्ठेच्या 'कॉमनवेल्थ पब्लिक लीडरशिप रिकग्निशन' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यूके एशियन बिझनेस कौन्सिल आणि 'कॅनव्हास फॉर केअर क्रिएटिव्ह आर्ट कॅम्पस' यांच्या वतीने आयोजित या सोहळ्यात उत्तर आयर्लंडच्या माजी फर्स्ट मिनिस्टर बॅरोनेस आर्लेन फॉस्टर, कौन्सिलचे चेअरमन अँर्ड्यू ग्रोकॉक, उपाध्यक्ष सुदीप सकाळे यांच्यासह विविध देशांचे राजदूत आणि जागतिक उद्योजक उपस्थित होते.

पुरस्कार स्वीकारल्यानंतर उपमुख्यमंत्र्यांनी आपल्या भाषणाची सुरुवात 'नमस्कार, जय महाराष्ट्र!' अशी



मराठीतून करत उपस्थितांची मने जिंकली. 'आई आणि पत्नीच्या काबाडकष्टांतूनच सर्वसामान्यांची सेवा करण्याची माझी विचारसरणी घडली,' असा भावूक उल्लेख त्यांनी करताच सभागृहात टाळ्यांचा कडकडाट झाला. मुंबई आणि लंडन ही दोन्ही जागतिक वित्तीय केंद्रे असल्याचे नमूद करत त्यांनी महाराष्ट्र आणि ब्रिटनदरम्यानच्या सहकार्यावर भर दिला. फिनटेक, ग्रीन एनर्जी, ग्रीन हायड्रोजन, डीप-टेक आणि कौशल्य विकास या क्षेत्रांत मोठी संधी असल्याचे सांगत त्यांनी महाराष्ट्राच्या विकासाची यशस्वी घौडदौड जागतिक व्यासपीठावर मांडली.

# भाऊबीजेला नक्की जाऊ, भाऊ संकटात पडेल असे करू नये!

**मुंबई :** महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांनी मराठा आरक्षण कार्यकर्ते मनोज जरांगे पाटील यांना आपला भाऊ म्हटले आहे. बुधवारी रात्री नागपूरमधील एका कार्यक्रमानंतर त्या म्हणाल्या- जरांगेजी माझे भाऊ आहेत. ते माझ्या घरी जेवायला यावेत अशी माझी इच्छा आहे. जरांगे गेल्या १३ दिवसांपासून जालना जिल्ह्यातील आंतरवाली सराटी गावात मराठा समाजाला ओबीसी अंतर्गत आरक्षण देण्याच्या मागणीसाठी आंदोलन करत आहेत.प्रतिक्रिया देताना मनोज जरांगे पाटील पुढे म्हणाले, बहिणीने जेवायला बोलावले आहे; तर भाऊबीजेला नक्कीच बहिणीकडे जेवायला जाऊ. पण आता आंदोलन सुरू आहे, त्यामुळे त्यांनी आता बोलावू नये. भाऊ संकटात पडेल असे बहिणीने करू नये. भाऊबीजेला साडीचोळी घेऊन जाऊ. त्यांनी चांगल्या भावनेने बोलावले आहे, त्यामुळे उगाच चुकीचा अर्थ काढण्याला किंवा आडवे जाण्याला काही अर्थ नाही. भावाचे नाते जोडले आहे, तर भाऊबीजेला त्यांच्याकडे जेवायला जाऊ.



**आज बैलपोळा...!**

शेतकऱ्यांचा जीवाभावाचा सखा असलेल्या बैलाचा आज सण. बैलाच्या ऋणातून उतराई होण्यासाठी, कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी बैलपोळा साजरा करण्यात येतो. त्यानिमित्त पोळा चौकातील बैलजोडीची आकर्षक रंगरंगोटी व सजावट करण्यात आली आहे.

# 11 सप्टेंबरला बँक संप!

प्रतिनिधी १० ऑगस्ट

अकोला : युनायटेड फोरम ऑफ बँक युनियन्स ने येत्या ११ सप्टेंबर २०२६ रोजी एका दिवसाच्या देशव्यापी संप पुकारला आहे. या संपामुळे बँकिंग सेवांवर परिणाम होण्याची शक्यता असल्याने, स्टेट बँक ऑफ इंडिया ने आपल्या सर्व ग्राहकांसाठी एक महत्त्वाची सूचना जारी केली आहे.

बँक प्रशासनाने स्पष्ट केले आहे की संपाच्या दिवशी आवश्यक सेवा सुरळीत ठेवण्याचा पूर्ण प्रयत्न केला जाईल, तरीही ग्राहकांनी गैरसोय टाळण्यासाठी पुढील गोष्टींची काळजी घ्यावी. आपली कोणतीही महत्त्वाची बँकिंग कामे किंवा व्यवहार ११ सप्टेंबरपूर्वीच पूर्ण करून घ्यावेत. रोख रकमेच्या (कॅश) गरजेसाठी ए टी एम आणि ऑटोमेटेड डिपॉझिट विथड्रॉल मशीनचा वापर करावा. इंटरनेट बँकिंग, युनो ॲप, मोबाईल बँकिंग आणि यु पी आय सारख्या डिजिटल पर्यायांचा वापर करावा. स्थानिक ग्राहक सेवा केंद्रांचीही मदत घेता येईल.

# मला लाज वाटते, मुंबई-गोवा हायवेला इतका उशीर झालाय!

## ना. नितीन गडकरी : उद्घाटनाला येणार नसल्याची घोषणा



प्रतिनिधी १० ऑगस्ट

गोवा : मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग हा गेली काही वर्षं चर्चेचा विषय ठरला आहे. या महामार्गाचे काम गेले १६ ते १७ वर्षे रडतखडत सुरु आहे, या महामार्गाला खूप वेळ लागला हे माझं दुर्भाग्य आहे, अशी खंत व्यक्त करत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी कंत्राटदार-अधिकारी यांच्याविषयी जाहीरपणे नाराजी मांडली आहे. महामार्गाच्या रखडलेल्या कामावरुन कॉन्ट्रॅक्टर आणि अधिकाऱ्यांवर त्यांनी निशाणा साधला. एवढंच नाही, तर इतका उशीर झाल्याची मला लाज वाटते, त्यामुळे मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या उद्घाटनाला आता मी येणार नाही, असे यापूर्वीच जाहीर केले होते, त्याचा पुनरुच्चार नितीन गडकरी यांनी केला आहे. गोव्यातील पर्वरी येथील ६-लेन एलिव्हेटेड कॉरिडॉरच्या (उन्नत मार्ग) उद्घाटनात सहभागी होताना आनंद होत आहे. ६४१.४६ कोटी रुपये मंजूर खर्चातून उभारण्यात आलेल्या ५.१५ किमी लांबीच्या उन्नत मार्ग प्रकल्पाच्या उद्घाटनप्रसंगी नितीन गडकरी बोलत होते.

यावेळी केंद्रीय मंत्री श्रीपाद नाईक, गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत, मंत्री दिगंबर कामत आदी मान्यवर उपस्थित होते. गडकरी पुढे म्हणाले की, मुंबई गोवा महामार्ग पूर्ण होण्यासाठी बराच उशीर झाला यात माझी चूक नाही.

अनेक कॉन्ट्रॅक्टर फेल झाले. माझ्या डिपार्टमेंटचे जगात सात वर्ल्ड रेकॉर्ड आहेत, पण मला आता आणखी एक वर्ल्ड रेकॉर्ड करायचा आहेस जास्तीत जास्त कॉन्ट्रॅक्टरना ब्लॅक लिस्टेड करणं आणि अधिकाऱ्यांना सस्पेंड करणं आणि यामुळे मी आता जाहीर केलं की मी मुंबई गोवा महामार्गाच्या उद्घाटनासाठी आता येणार नाही, असं म्हणत महामार्गाचे ठेकेदार व अधिकारी यांच्यावर थेट कारवाई करण्याचाच मोठा इशारा गडकरी यांनी दिला आहे.

### माझ्या कर्मभूमीतूनच उभा राहणार

नितीन गडकरी यांच्या पूर्वीच्या एका विधानावरून त्यांच्या राजकीय निवृत्तीच्या चर्चा सुरू झाल्या होत्या. मात्र या चर्चेला आता थेट नितीन गडकरी यांनीच पूर्णविराम दिला आहे. मला योगायोगाने अनेक राज्यातून विचारतात आणि मी उभे राहावं यासाठीही मला अनेकांनी ऑफर दिली, पण एक सांगतो, मी माझ्या कार्यभूमी व कर्मभूमीतूनच उभा राहणार, जोपर्यंत मला पार्टी संधी देईल, तोपर्यंत तिथूनच मी उभा राहणार, माझा मतदारसंघ काही मी सोडणार नाही असं म्हणत आपण पुढच्या लोकसभेला नागपूर येथूनच लढणार असल्याचे स्पष्ट संकेत त्यांनी दिले.




सिटी न्यूज सुपरफास्ट विविधा २
गुरुवार, दि. १० सप्टेंबर २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com

## ग्रामीण भागातील पोळा

ग्रामीण भाग आणि शेतीसंस्कृतीमध्ये ग्रामीण पोळा किंवा बैलपोळा हा शेतकऱ्यांचा सर्वांत महत्त्वाचा आणि आनंदाचा सण मानला जातो. वर्षभर शेतात अहोरात्र कष्ट करणाऱ्या सर्जा-राजा (बैल) प्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा सण साजरा केला जातो.

श्रावण महिन्याच्या अमावस्येला (पिठोरी अमावस्या) हा सण मोठ्या उत्साहात पार पडतो.

**ग्रामीण पोळ्याची वैशिष्ट्ये व परंपरा :**

खांदे मळणी (पोळ्याचा आदला दिवस): पोळ्याच्या आदल्या दिवशी बैलांच्या खांद्याला हळद आणि मोहरीचे तेल लावून शेकले जाते. याला 'खांदे मळणी' म्हणतात, ज्यामुळे वर्षभराच्या कष्टाचा बैलांचा थकवा दूर होतो.

**बैलांचे स्नान व सजावट :** पोळ्याच्या दिवशी बैलांना नदी, तलाव किंवा विहिरीवर नेऊन स्वच्छ आंघोळ घातली जाते. त्यानंतर बैलांच्या पाठीवर रंगीबेरंगी झुली टाकल्या जातात.

# शेतकऱ्यांचा उत्साहाचा आणि आनंदाचा सण बैलपोळा

भारतीय संस्कृती ही पुरातन संस्कृती आहे.त्याचप्रमाणे भारत कृषीप्रधान देश आहे. त्यामुळे संपूर्ण शेतीतील कामे बैलांच्याच मदतीने केली जात होती आणि आताही केली जातात.त्यामुळे भारतात आपल्याला वेगवेगळे सण उत्सव पहायला मिळतात. बैलपोळा हा सण शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचा मानल्या जातो.कारण पुर्वी संपूर्ण कामे बैलांच्याच मदतीने व्हायची व बैल बीना संपूर्ण कामे अधुरी रहायची.श्रावण महिन्यातील अमावस्येला हा सण उत्सव शेतकरी मोठ्या उत्साहाने बैलांची पूजाअर्चना करून साजरा करतात.या सणाला पिठोरी अमावस्या,मोठा पोळा किंवा बैलपोळा असेही म्हणतात.



या दिवशी संपूर्ण शेतकरी बांधवांचा परिवार बैलांच्या सेवेत मग्न असतात. बैलपोळ्याला शेतकरी दिवाळीसारखा सण साजरा करतात.त्या दिवशी बैलांपासुन कोणतेही काम करून घेतले जात नाही व बैलांची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा सण साजरा करण्यात येतो.या सणाची सुरूवात बैलपोळ्याच्या एक दिवस अगोदर सुरूवात होते.बैलपोळ्याच्या एकदिवस अगोदर मातीचे बैल बनवून त्याची पुजाअर्चना केली जाते व त्यांना नैवेद्य केला जातो.त्याच दिवशी म्हणजे बैलपोळ्याच्या एक दिवस अगोदर बैलांची पुजा केली जाते त्याला खांदशेकणी असे म्हणतात. कारण वर्षभर बैलांना शेतकरी राबवितो अशा परिस्थितीत त्यांच्या खांद्याला अनेक जखमा होतात.म्हणुनच म्हणतात "कुणाचे ओझे कुणाच्या खांद्यावर" अशी जी म्हण आहे ती सत्य आहे. देशातील करोडो लोकांना अन्न पुरवठा व्हावा या उद्देशाने शेतकऱ्यांना बैलांपासुन काम करून घ्यावे लागते. बैलाला वर्षभर यातना भोगाव्या लागतात.तेव्हाच देशातील करोडो लोकांना अन्नधान्य मिळते.कारण वर्षभर नांगर,वखर,बंडीचे जु त्यांच्या खांद्यावर सतत असते. अशाप्रकारे वर्षेभर शेतात राबराब राबतात.परंतु बैलपोळ्याच्या एक दिवस अगोदर त्यांची आंघोळ करून त्यांच्या खांद्यावरील जखमांवर हळद लावून त्यांना दिलासा देतात.त्यालाच खांदशेकणी असे म्हणतात. खांदशेकनीच्या दिवशी प्रत्येक शेतकरी आपल्या बैलांना आमंत्रण (आवतन) देतांना म्हणतात "आज आवतन घ्या उद्या जेवायला या" ज्याप्रमाणे लग्नाकरीता नवरदेवाला सजविल्या जाते व अगोदरच्या दिवशी हळद लावल्या जाते त्याचप्रमाणे बैलाला हळद लावून दुसऱ्या दिवशी सजवून बैलपोळ्याच्या दिवशी बैलांची आंघोळ करून नीटनेटक्या पध्दतीने बैलांची सजावट करून ढोलताशेरे वाजवुन वाजत-गाजत, नाचत-कुदत बैलांना पोळ्याच्या ठिकाणी एकत्र आणले जाते व प्रत्येक गावागावात किंवा शहरात महत्वाच्या ठिकाणी संपूर्ण बैल एकत्र होतात व संपूर्ण शेतकरी एकमेकांना आलिंगन घालून बैलपोळ्याच्या शुभेच्छा देतात.या दिवशी बैल किंवा शेतमजूर यांच्या कामाला पुर्णतः सुट्टी असते.जो बैल वर्षभर शेतात राबतो आणि आपल्यासाठी कष्ट करतो त्याला फक्त बैलपोळ्याच्या दिवशीच विश्रांती मिळते. यानंतर दुसऱ्याचं दिवशी तान्ह्या पोळा येतो या दिवशी बैलांचे महत्त्व लहान मुलांना समजावे या उद्देशाने लाकडाचे बैल सजवुन पोळ्यामध्ये नेण्यात येते व संपूर्ण बालगोपाल तान्ह्या पोळ्यांचा आनंद लुटतात व बैल घरोघरी घेऊन जातात आणि त्याची पुजाअर्चना केली जाते व बालगोपालांना पैसे किंवा भेट वस्तू देऊन त्यांचा आनंद व्दिगुणित केला जातो.अशा प्रकारे मोठ्या व्यक्तींपासुन तर बालगोपालांपर्यंत सर्वत्र बैलपोळ्याचा व तान्ह्या पोळ्याचा आनंद घेतांना दिसतात.अशा प्रकारे भारतीय संस्कृतीत प्रत्येक सणांना आगळेवेगळे महत्व आपल्याला दिसून येते.त्यामुळे यात सर्वच मोठ्या उत्साहाने सहभागी होतात. जो व्यक्ती किंवा शेतकरी बैलांना पोळ्यात घेऊन जातो त्याचाही मानसन्मान केला जातो. अशाप्रकारे शेतकऱ्यांसाठी वर्षभर राबणाऱ्या व प्रत्येक कामात सोबत तत्परतेने काम करणारा, धान्यासाठी वर्षभर कष्ट करणारा शेतकऱ्यांचा खरा सोबती,सखा जिवलग मित्र म्हणजे बैल. त्यामुळे बैलांची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा सण अत्यंत महत्त्वाचा आहे.शेतकरी आपल्या पध्दतीने कष्ट करून शेती पिकवितात व संपूर्ण शेत हिरवागार गालिचाच्या रूपात आपल्याला दिसुन येते.त्यामुळे सर्वसामान्यांना, सामाजिक संस्थांना व सरकारला विनंती आहे की पोळ्याचे औचित्य साधून वृक्षारोपण केले पाहिजे.कारण देशातील बदलते हवामान व वाढता अलनिनोचा प्रभाव आणि २६ ऑगस्ट २०२६ ला नेपाळमधील महाभयानक नैसर्गिक आपदांमुळे झालेली जिवीत हाणी लक्षात घेता वृक्षलागवड करून निसर्गाला वाचविने आपले प्रथम कर्तव्य आहे. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांना ओला दुष्काळ,कोरडा दुष्काळ यांचा नेहमीच सामना करावा लागतो आणि आता सध्याच्या परिस्थितीत देशातील अनेक भाग जलमग्न झाले आहे आणि अनेक शेतकऱ्यांची पीके पाण्याखाली आल्याने अत्यंत चिंतेत आहे व सध्याच्या मुसळधार पावसामुळे संपूर्ण जनजीवन विस्कळित झाले आहे यात वित्तीय हानी व मानवीय हानी सुध्दा झाली आहे किंवा होत आहे.अशा कठीण प्रसंगी शेतकऱ्यांना निसर्गापासुन ताबडतोब दिलासा मिळावा हिच ईश्वरचरणी प्रार्थना करतो.त्याच प्रमाणे देशात अती पाऊस,अती उष्णता, सुनामी, भूकंप,ग्लेशियर वितळने,भुस्कखलन,ढगफुटी, ज्वालामुखीचा उद्रेक,नद्यांना महापुर इत्यादी भयावह घटना बदलत्या हवामानामुळे दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात वाढलेल्या आहेत. यामुळे राज्यासह देशात मोठ्या प्रमाणात जीवीत व वित्तीय हानी होत आहे .त्यावर फुंकर घालण्यासाठी वृक्षलागवड ही काळाची गरज आहे.यामुळे पृथ्वीचे संतुलन राखण्यास मोठी मदत होईल व गुरांना चारा मिळेल,सर्वांना शुध्द हवा मिळेल, ऑक्सिजनची मात्रा वाढण्यास मदत होईल व सृष्टी प्रफुल्लित राहील.बैल पोळ्याच्या हार्दिक शुभेच्छा!जय जवान जय किसान!जय हिंद.

**रमेश कृष्णराव लांजेवार**
( स्वतंत्र पत्रकार ) नागपूर.
मो.नं.९९२१६९०७७९

# बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करणारा हा एक मराठी सण

भारत हा कृषीप्रधान देश असून, शेतकरी आणि बैल यांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. पोळा हा शेतकरी लोकांचा एक सणच असतो. शेतकर्‍यांचा महत्वाचा साथीदार बैल. बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करणारा हा एक मराठी सण असून हा विशेषतः विदर्भात भव्य पातळीवर साजरा केला जातो, विदर्भातील सीमेवर असलेल्या मध्य प्रदेश व तेलंगण सीमाभागातसुद्धा हा सण साजरा होतो. ज्यांच्याकडे शेती नाही ते मातीच्या बैलाची पूजा करतात. नागपंचमी, नारळी पौर्णिमा, रक्षाबंधन, गोकुळाष्टमी या सणांबरोबरच सरत्या श्रावणात पिठोरी अमावस्येला संपूर्ण महाराष्ट्रात साजरा केला जातो असा सर्जा-राजाचा पारंपरिक सण म्हणजे 'पोळा'. श्रावण महिन्यातील अमावास्येला देशभरातील शेतकरी आपल्या गायी व बैलांची पूजा करतात. बैलांना अंघोळ घालून स्वच्छ केले जाते आणि त्यांना चमकदार फिती, घंटा, फुले, आणि शाल यासारख्या सजावटीने सजवले जाते. या दिवशी ढोल, ताशे आणि इतर वाद्यांच्या साथीने बैलांची शोभायात्रा काढली जाते. पौराणिक कथेनुसार, या दिवशी भगवान श्रीकृष्णाने पोलासुर नावाच्या राक्षसाचा वध केला होता. त्यामुळे या दिवशी मुलांचे आणि प्राण्यांचे महत्त्व अधोरेखित होते. बैलांना तेल लावून मसाज केला जातो आणि नंतर त्यांना शाल, फुले, घंटा, आणि इतर सजावटींनी सजवले जाते. बैलांसाठी विशेष पूजा केली जाते. गाई व बैलांची आरती करण्यासाठी तुपाचे दिवे प्रज्वलित केले जातात. बैलांना दिवसभर विश्रांती दिली जाते आणि त्यांचे कौतुक केले जाते. लोक घरांना तोरण व रांगोळीने सजवतात, पूजा थाळ्या तयार करतात, आणि सणासाठी पुरणपोळी व इतर महाराष्ट्रीय खाद्यपदार्थ बनवले जातात. लहान मुले लाकडाच्या बैलांच्या प्रतिकृती तयार करतात.

हा दिवस बैलांचा विश्रांतीचा दिवस असतो. पोळ्याच्या आदल्या दिवशी बैलांना आमंत्रण (आवतण) देण्यात येते. पोळ्याला त्यांना नदीवर/ओढ्यात नेऊन त्यांना आंघोळ घालतात. नंतर चरायला देऊन घरी आणतात. या दिवशी बैलाच्या खांद्याला (मान जिथे शरीराला जोडली असते तो भाग) हळद व तुपाने (किंवा तेलाने) शेकतात. याला 'खांद शेकणे' अथवा 'खांड शेकणे' म्हणतात. त्यांच्या पाठीवर नक्षीकाम केलेली झूल (पाठीवर घालायची शाल), सर्वांगावर गेरूचे ठिपके, शिंगांना बेगड, डोक्याला बाशिंग, गळ्यात कवड्या व घुंगरांच्या माळा, नवी वेसण, नवा कासरा (आवरायची दोरी) पायात चांदीचे वा करदोड्याचे तोडे घालतात. त्याला खायला गोड पुरणपोळी व सुग्रास अन्नाचा नैवेद्य देतात. बैलाची निगा राखणाऱ्या 'बैलकरी' घरगड्यास नवीन कपडे देण्यात येतात. या सणासाठी शेतकऱ्यांमध्ये उत्साह असतो. आपला बैल उठून दिसावा यासाठी शेतकरी आपल्या ऐपतीप्रमाणे त्याचा साजश्रृंगार खरेदी करतात. बैल सजवितात व पोळ्याच्या मिरवणुकीत भाग घेतात. गावाच्या सीमेजवळच्या शेतावर (आखरावर) आंब्याच्या पानाचे एक मोठे तोरण करून बांधतात. या सणादिवशी महाराष्ट्रातल्या खेड्यांमधल्या प्रत्येक घराला आंब्याच्या पानांचे तोरण बांधले जाते. त्या जवळ गावातल्या सर्व बैलजोड्या, वाजंत्री, सनई, ढोल, ताशे वाजवत एकत्र आणल्या जातात. या वेळेस 'झडत्या' (पोळ्याची गीते) म्हणायची पद्धत आहे. त्यानंतर, 'मानवाईक' (ज्याला गावात मान आहे तो-गावचा पाटील/श्रीमंत जमीनदार) तोरण तोडतो व पोळा 'फुटतो'. नंतर बैल मारुतीच्या देवळात नेतात व नंतर घरी नेऊन त्यांना ओवाळतात. बैल नेणाऱ्यास 'बोजारा' (पैसे) देण्यात येतात. शेतकरी वर्गात हा सण विशेष महत्त्वाचा मानला गेल्याने तो उत्साहाने साजरा करण्यात येतो.




**तान्हा पोळा :** विदर्भातील बऱ्याच भागात बैल पोळा हा सण सलग दोन दिवस साजरा केला जातो. पहिल्या दिवशी मोठा बैल पोळा आणि दुसऱ्या दिवशी छोटा बैल पोळा. मोठ्या पोळ्याच्या दिवशी शेतकरी बैलाला सजवून त्याची पूजा केली जाते, तर तान्ह्या बैल पोळ्याच्या दिवशी शेतकऱ्याची लहान मुले त्यांच्यासाठी आणलेले मातीचे बैल सजवून घरोघरी नेत असतात. त्या बदल्यात या बालगोपालांना लोक पैसे किंवा भेटवस्तू देऊन खुश करत असतात.

**कर्नाटकी बेंदूर :** महाराष्ट्र-कर्नाटक सीमेवरील काही भागात उदा. कोल्हापूर जिल्ह्यात कर्नाटकी बेंदूर साजरा केला जातो. हा सण वटपौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी असतो. या दिवशी बैलांना शेतीच्या कामातून विश्रांती दिली जाते. पोळ्याप्रमाणेच बैलांना सजवून मिरवणुका काढल्या जातात. संध्याकाळी कर तोडण्याचा कार्यक्रम असतो.

# पोळ्याची लोक परंपरा

पिठोऱ्याचे हे संचित
जाय चितारून पोळा
दिव्य जगण्याला देई
भव्य संस्कृतीची कळा.

डॉ. विठ्ठल वाघ

लोककवी डॉ. विठ्ठल वाघ यांच्या पोळा या सणाच्या संदर्भात वरील चार ओळी अत्यंत संक्षिप्त असल्या तरी पोळा, पिठोरा, शेतकरी जीवन, लोककला आणि सांस्कृतिक स्मृती यांना एका सुंदर प्रतिमेत बांधतात.

ओळींचा अर्थ....

“पिठोऱ्याचे हे संचित
जाय चितारून पोळा”

येथे ‘पिठोरा’ ही केवळ चित्रकला नसून ग्रामीण जीवनाच्या अनुभवांचे, श्रद्धांचे, निसर्गाशी असलेल्या नात्याचे आणि लोकस्मृतीचे सांस्कृतिक संचित आहे. बैल, शेती, निसर्ग, देवता, मानवी जीवन यांच्याशी जोडलेल्या प्रतिमा लोककलावंताच्या मनात साठत जातात. पोळ्याच्या निमित्ताने हेच संचित रंग-रेषांच्या माध्यमातून व्यक्त होते. 'जाय चितारून’ या शब्दांत एक सुंदर हालचाल आहे—मनात साठलेली संस्कृती चित्ररूपाने बाहेर येते. म्हणजेच लोककला ही केवळ सजावट नसून पिढ्यान्‌पिढ्या साठलेल्या जीवनानुभवांचे दृश्य रूप आहे.

“दिव्य जगण्याला देई
भव्य संस्कृतीची कळा.”

या द्विपदीत कवीने अत्यंत सुंदर तात्त्विक उंची गाठली आहे. ग्रामीण माणसाचे साधे, कष्टमय जगणे कवीला ‘दिव्य’ वाटते. कारण त्या जगण्यात श्रमाची प्रतिष्ठा, निसर्गाशी मैत्री, पशुधनाविषयी कृतज्ञता आणि उत्सवातून व्यक्त होणारी सामूहिकता आहे.

त्या साध्या जगण्याला ‘भव्य संस्कृतीची कळा’ देण्याचे काम पिठोरा आणि पोळ्याच्या लोकपरंपरा करतात. येथे ‘कळा’ या शब्दाला दुहेरी अर्थछटा आहे—कला आणि सांस्कृतिक सौंदर्याची छटा. त्यामुळे ‘दिव्य’ आणि ‘भव्य’, ‘जगणे’ आणि ‘संस्कृती’, ‘पिठोरा’ आणि ‘पोळा’ यांचा अत्यंत अर्थपूर्ण मेळ साधला आहे.

*साहित्यिक वैशिष्ट्य *

या ओळींचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे ‘लघुत्तम शब्दांत व्यापक सांस्कृतिक आशय’. पोळा हा केवळ बैलांचा सण न राहता येथे श्रमसंस्कृतीचा उत्सव बनतो आणि पिठोरा ही केवळ लोकचित्रकला न राहता लोकजीवनाच्या सामूहिक स्मृतीचे चित्ररूप संचित ठरते.

‘संचित–चितारून’, ‘दिव्य–भव्य’ या शब्दयोजनेमुळे नादसौंदर्यही निर्माण होते. चार ओळींत लोककला लोकजीवन श्रमसंस्कृती सांस्कृतिक वैभव असा अर्थविस्तार घडतो.

**एका वाक्यात सांगायचे तर ....**

पिठोऱ्याच्या रंग-रेषांत साठलेली लोकस्मृती जेव्हा पोळ्याच्या उत्सवात उमलते, तेव्हा शेतकऱ्याचे साधे श्रममय जीवनही भव्य सांस्कृतिक सौंदर्याने उजळून निघते.

ही कविता ‘लोककला ही लोकजीवनाची दृश्य आत्मकथा आहे’ या भूमिकेचे अत्यंत सुंदर काव्यात्मक विधान लोककवी डॉ. विठ्ठल वाघ यांनी केले आहे असे म्हणता येईल.

**प्रा. डॉ. सुहास उगले**
अकोला

# मूल्य शिक्षण : माणूस घडविणारी शिक्षणप्रक्रिया



" शिक्षणाचे अंतिम ध्येय केवळ यशस्वी व्यक्ती घडविणे नसून, एक चांगला माणूस घडविणे हे आहे." आजचे युग हे विज्ञान, तंत्रज्ञान आणि माहितीचे युग आहे. एका क्लिकवर जगभरातील माहिती आपल्या हातात उपलब्ध होते. शिक्षणाच्या क्षेत्रातही तंत्रज्ञानामुळे मोठे परिवर्तन झाले आहे. शिक्षणाच्या स्वरूपात सहजता आणि सोपेपणा झाले आहे. स्मार्ट क्लासरूम, डिजिटल साधने, ऑनलाईन शिक्षण आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यामुळे विदयार्थाच्या शिकण्याच्या संधी वाढल्या आहेत. मात्र या सर्व प्रगतीसोबत एक प्रश्न महत्वाचा ठरतो - या ज्ञानाचा उपयोग विदयार्थी कोणत्या मूल्यासाठी करणार ?ज्ञानाला जर संस्काराची गरज नसेल, तर शिक्षण अपूर्ण राहते. म्हणूनच आजच्या शिक्षणव्यवस्थेत मूल्य शिक्षणाची गरज पूर्वीपेक्षा अधिक आहे.

**मूल्यशिक्षण म्हणजे काय ?**

मूल्यशिक्षण म्हणजे विद्यार्थ्याच्या मनात चांगले विचार, सकारात्मक दृष्टिकोन आणि योग्य आचरणाची जडणघडण करणारी प्रक्रिया होय. सत्य, प्रामाणिकपणा, सहिष्णूता, देशप्रेम, वैज्ञानिक दृष्टिकोन, पर्यावरणप्रेम यांसारखी मूल्ये विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाला आकार देतात. मूल्ये केवळ पुस्तकातील धड्यामंधून शिकविता येत नाहीत, ती अनुभवातून, कृतीतून आणि आदर्श वर्तनातून अधिक प्रभावीपणे रुजतात.

***संस्काराची पहिली शाळा : कुटूंब***

मुलांच्या आयुष्यातील पहिली शाळा म्हणजे त्यांचे घर आणि पहिले शिक्षक म्हणजे त्यांचे पालक. मुलं मोठ्यंचि बोलणे ऐकण्यापेक्षा त्यांचे वर्तन अधिक बारकाईने पाहतात. घरातील संवाद, परस्परांचा आदर, प्रामाणिकपणा, सहकार्य आणि गरजू व्यक्तीना मदत करणे या वृत्ती मुलांच्या मनावर खोल परिणाम करते. म्हणूनच पालकांनी मुलांना केवळ चांगले गुण मिळविण्यासाठी प्रोत्साहन न देता चांगले वागण्यासाठी, योग्य निर्णय घेण्यासाठी आणि इतरांचा आदर करण्यासाठी प्रेरित करणे आवश्यक आहे.

**शिक्षक : मूल्यांचा जिवंत आदर्श***

शाळेत मूल्यशिक्षण रुजविण्यात शिक्षकाची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. शिक्षकाचे बोलणे, वागणे, विद्यार्थ्यांशी असलेला संवाद आणि प्रत्येक विदयार्थ्यांकडे पाहण्याचा दृष्टीकोन यातून अनेक मूल्ये विद्यार्थ्यांप पोहोचतात. वेळेचे पालन करणारा शिक्षक विद्यार्थ्यांना शिस्त शिकवितो.

सर्व विद्यार्थ्यांना समान संधी देणारा शिक्षक समानतेचे मूल्य शिकवित चूक झाली तर ती शांतपणे समजावून सांगणारा शिक्षक संवेदनशील शिकवितो. स्वतः प्रामाणिकपणे काम करणारा शिक्षक विद्यार्थ्यांसमोर प्रामाणिकपणाचा आदर्श ठेवतो. म्हणूनच मूल्य शिक्षणाचा सर्वात प्रभावी घडा म्हणजे शिक्षकांचे स्वतःचे आचरण

***कृतीतून मूल्यशिक्षण***

मूल्यशिक्षण केवळ भाषणांपुरते मर्यादित राहता कामा नये विद्यार्थाना विविध उपक्रमांमध्ये सहभागी करून घेतल्यास मूल्ये त्यांच्या अनुभवाचा भाग बनतात..

उदा. शाळा स्वच्छता उपक्रमातून स्वच्छता व जबाबदारी,. वृक्षारोपणातून पर्यावरणप्रेम, राष्ट्रीय सणामंधून देशप्रेम, विविध सांस्कृतिक कार्यक्रमांतून सामाजिक ऐक्य व विविधतेचा आदर वाचन उपक्रमातून ज्ञानाची आवड, क्रीडा उपक्रमातून शिस्त व खिलाडीवृत्ती अशा कृतीमधून विद्याथाना मूल्याचा प्रत्यक्ष अनुभव मिळतो.

***डिजिटल युगातील मूल्यशिक्षण***

आजच्या विद्यार्थाच्या डिजिटल साधनाचे महत्व त्यांच्या जीवनात वाढले आहे. त्यामुळे पारंपारिक मूल्यांसोबत डिजिटल जगाशी संबंधित मूल्यांची जडणघडण करणेही गरजेचे आहे. इंटरनेट वरील माहितीचा योग्य वापर करणे, चूकीची माहिती पुढे न पाठविणे, इतरांच्या मतांचा आदर करणे, डिजिटल साधनांचा जबाबदारीने वापर करणे आणि ऑनलाईन संवादात सभ्य भाषा वापरणे ही देखील आजच्या काळातील महत्वाची मूल्ये आहेत. तंत्रज्ञान हातात असणे महत्त्वाचे आहे; पण त्याचा विवेकाने वापर करण्याची मूल्यदृष्टी त्याहून महत्वाची आहे.

**मूल्यशिक्षण आणि विद्यार्थी व्यक्तिमत्व**

मूल्यशिक्षणामुळे विद्याश्याच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास होतो. त्यांच्यात आत्मविश्वास, निर्णयक्षमता, संवेदनशीलता, सहकार्याची भावना आणि जबाबदारीची जाणीव होते. अभ्यासात चांगले गुण मिळविणारा विद्यार्थी यशस्वी होऊ शकतो; परंतु इतरांच्या यशाचा आनंद घेणारा, अपयशातून शिकणारा गरजूला मदतीचा हात देणारा आणि समाजासाठी योगदान देणारा विद्यार्थी खऱ्या अर्थाने समृद्ध व्यक्तिमत्व बनतो.

**शाळा: मूल्यांची प्रयोगशाळा**

शाळा ही केवळ पुस्तकी ज्ञान देणारी संस्था नसून समाजाचे भविष्य घडविणारी जागा आहे. प्रत्येक वर्ग, प्रत्येक उपक्रम आणि प्रत्येक संवाद हा मूल्ये शिक्षणाची संधी ठरु शकतो. विद्यार्थीच्या चुका शिक्षा देऊन संपवण्याऐवजी त्यातून शिकण्याची संधी दिली, तर जबाबदारीची भावना विकसित होते. विद्यार्थ्यांना प्रश्न विचारण्याची मोकळीक दिली, तर विचारस्वातंत्र्य विकसित होते. प्रत्येक विद्यार्थ्यांचा सन्मान केला, तर समानतेची भावना रुजते अशा वातावरणातून शाळा ही खऱ्या अर्थाने मूल्यांची प्रयोगशाळा " बनते. आजच्या बदलत्या जगात शिक्षणाचे स्वरूप बदलत आहे. परंतु चांगला माणूस घडविण्याचे शिक्षणाचे मूलभूत उद्दिष्ट बदलता कामा नये. ज्ञान विद्यार्थाला सक्षम करते, कौशल्ये त्याला आत्मनिर्भर बनवतात, पण मूल्ये त्याला माणूस बनवतात.

म्हणून मूल्यशिक्षण ही केवळ अभ्यासक्रमातील एक संकल्पना न राहता ती शाळेच्या संस्कृतीचा, शिक्षकांच्या आचरणाचा आणि विद्यार्थाच्या दैनंदिन जीवनाचा भाग झाली पाहिजे

" मुल्यांची पेरणी बालमनात केली, तर उद्याचा समाज अधिक सुंदर, संवेदनशील आणि सुसंस्कृत घडेल "

हीच मूल्य शिक्षणाची खरी ताकद आणि शिक्षणव्यवस्थेची खरी जबाबदारी आहे.

**कु. वंदना पंजाबराव चव्हाण स.शि**
जि.प. प्राथ शाळा चिरंगवाडी
केंद्र गौळ खु ता. पुसद
जि. यवतमाळ
मो. क्र. 9527728362

सिटी न्यूज अकोला
गुरुवार, दि. १० सप्टेंबर २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com



# बार्शीटाकळी तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करा; तहसीलदारांना निवेदन सादर

प्रतिनिधी १० सप्टेंबर

**बार्शीटाकळी :** तालुक्यातील शेतक-यांनी तहसीलदार यांना निवेदन देऊन तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करण्याची मागणी केली. शेतामध्ये सोयाबीन सुकत आहे. पाऊस नसल्याने शेतकऱ्यांवर जनावरे विकण्याची वेळ आली आहे. काही लोकांनी दागिने गहाण ठेवून शेतीची पेरणी केली.




दीड महिना झाला पावसाने दडी मारली. शेतकरी हवालदिल झाले आहे. शेतकऱ्यांनी बाजारपेठेतून सोयाबीनचे बियाणे विकत आणले व पेरणी केली. काही शेतकऱ्यांना डुप्लिकेट बियाणे मिळाले असून शेतकरी वर्ग त्रस्त झाले होते. बार्शीटाकळी तालुक्यातील कृषी अधिकारी कावला मॅडम यांना निवेदन देऊन सुद्धा कृषी अधिकारी यांनी कोणत्याही दुकानावर जाऊन बियाणे तपासले नाही असा आरोप आहे.

शेतकऱ्यांना दिलासा दिला नाही. काही शेतकरी कृषी अधिकारी कार्यालय समोर आमरण उपोषण ला सुद्धा बसले होते. पण काहीएक फरक पडला नाही. दुबार पेरणी करून उपयोग नाही. शेतातील पिकांची वाढ झाली परंतु पाण्याचा अभावाने पीक सुकत आहे. लागवडीचा खर्च निघणे अशक्य आहे. शेतकरी शासनाकडून अपेक्षा करीत आहेत. शासन व प्रशासन यांनी मदतीचा हात द्यावा अशी मागणी बार्शीटाकळीचे तहसीलदार यांना निवेदनात केली. शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**पावसाच्या ओढीमुळे शेतकरी अडचणीत; पिके करपण्याच्या मार्गावर**

गेल्या काही दिवसांपासून पावसाने दडी मारल्यामुळे तालुक्यातील खरीप पिके गंभीर अडचणीत सापडली आहेत. ऐन वाढीच्या आणि फळधारणेच्या काळातच पावसाची ओढ बसल्याने सोयाबीन, कापूस, तूर आणि मूग ही पिके करपू लागली आहेत. मुबलक पाणी न मिळाल्यास हाताशी आलेले पीक जाण्याची भीती शेतकरी व्यक्त करत आहेत.

जमिनीतील ओलावा वेगाने कमी होत असून, सिंचनाची सोय नसलेल्या कोरडवाहू शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. उत्पन्नात घट होण्याची शक्यता असल्याने शेतकरी हवालदिल झाले असून, संकट टळण्यासाठी आता मोठ्या पावसाची प्रतीक्षा केली जात आहे. अस्मानी आणि सुलतानी संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना आता शासकीय मदतीची अपेक्षा आहे. कारण त्याशिवाय दुसरा मार्ग दिसत नाही. याकडे लक्ष दिले जावे अशी मागणी केली जात आहे.

# पावसासाठी अमरनाथ यात्रेकरूंचा पंचकुंडीय महायज्ञ

प्रतिनिधी १० सप्टेंबर

**अकोला :** अकोला जिल्ह्यात पावसाने पुन्हा दडी मारल्याने खरीप पिके संकटात आली असून, धरणे व जलसाठेही अपेक्षेप्रमाणे भरलेले नाहीत. पऱ्हाटी, सोयाबीनसह विविध पिकांना पावसाची नितांत गरज असताना बळीराजाच्या सुख-समृद्धीसाठी बाबा अमरनाथ यात्रेकरूंनी वरुणराजाला साकडे घातले. गुड मॉर्निंग ग्रुपच्या वतीने रविवार, दि. ६ सप्टेंबर रोजी सृजन लॉन्स येथे पंचकुंडीय पूर्णाहुती महायज्ञाचे आयोजन करण्यात आले.

गुड मॉर्निंग ग्रुपचा अनोखा उपक्रम



गुड मॉर्निंग ग्रुपच्या १८ सदस्यांनी यावर्षी बाबा अमरनाथ यात्रेचे आयोजन केले होते. पहलगाम मार्गे दि. ८ जुलै रोजी बाबा अमरनाथांचे दर्शन घेण्यात आले. जम्मूतील कडक उन्हापासून सुरू झालेला हा प्रवास चंदनवाडी, शेषनाग आणि पंचतरणीचा खडतर मार्ग पार करीत पवित्र अमरनाथ गुहेपर्यंत पोहोचला. प्रतिकूल परिस्थिती, डोंगरदऱ्यांचा कठीण प्रवास आणि बदलते हवामान यावर मात करीत सर्व यात्रेकरूंना बाबा बर्फानींचे दर्शन झाले.

विशेष म्हणजे, यात्रेनंतर काश्मीरमध्ये मुसळधार पावसामुळे यात्रा बंद करण्याची वेळ आली. मात्र त्यापूर्वीच गुड मॉर्निंग ग्रुपच्या यात्रेकरूंना कोणताही मोठा अडथळा न येता दर्शनाचा लाभ मिळाला. दि. १५ जुलै रोजी सर्व यात्रेकरू अकोल्यात परतले.

अमरनाथ यात्रेतील पावसाचा अनुभव आणि अकोल्यातील पावसाची प्रतीक्षा, या पार्श्वभूमीवर ग्रुपच्या सदस्यांनी बळीराजासाठी सामूहिक प्रार्थनेचा संकल्प केला. श्रावणात हजारो शिवभक्तांनी राजराजेश्वराला जलाभिषेक केला असतानाही अकोला जिल्ह्यावर वरुणराजाची अपेक्षित कृपादृष्टी अद्याप झालेली नाही. काही भागांत झालेल्या तुटपुंज्या पावसाने शेतकऱ्यांना काहीसा दिलासा मिळाला; मात्र पावसाने पुन्हा विश्रापावसाने पुन्हा विश्रांती घेतल्याने पिकांची चिंता वाढली आहे. "शेतकरी सुखी झाला पाहिजे, पिके वाचली पाहिजेत, धरणे भरली पाहिजेत आणि वर्षभर पिण्याच्या पाण्याची चिंता राहू नये," या भावनेतून पंचकुंडीय महायज्ञाचे आयोजन करण्यात आले. गायत्री परिवाराचे डॉ. उपाध्याय यांच्या सहकार्याने विधिवत यज्ञ व पूर्णाहुती पार पडली.

यज्ञामध्ये डॉ. अशोक ओळंबे, प्रशांत बानोले, दिनकरराव घोडेराव, गजानन घोंगे, राजाभाऊ देशमुख, अरुण मानकर, ॲड. संतोष गोळे, गजानन गोलाईत, शिवहरी वाकोडे, अमोल हिंगणे, गजानन मोरे, चंदू घाटोळे, गजानन टाले, दत्ता भुसारी, गजानन दलाल व संतोष इंगोले यांनी सपत्नीक सहभाग घेतला. डॉ. पौर्णिमा ओळंबे यांचीही उपस्थिती होती. कार्यक्रमास संतोष काटे,किशोर वडतकर,प्रवीण कदम, सुरेंद्र सिरसाट यांच्यासह गुड मॉर्निंग ग्रुपचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शेतकऱ्यांना वीज नाही, मात्र दिवसभर पोलवरील दिवे सुरू

**मुर्तीजापूर :** शेतीसाठी आवश्यक असलेली वीज वेळेवर उपलब्ध होत नसल्याने शेतकरी त्रस्त असताना दुसरीकडे शहरातील विविध भागांमध्ये पथदिवे दिवसा मोठ्या कालावधीपर्यंत सुरू राहत असल्याचा प्रकार समोर येत आहे. हातगाव-राणा लेआउट परिसरातील पोलवरील दिवे २४ तास सुरू असल्याचे निदर्शनास येत असून, यामुळे विजेचा अनावश्यक वापर होत आहे. संबंधित विभागाने या बाबीकडे गांभीर्याने लक्ष देऊन वीज बचतीसह शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी ठोस उपाययोजना करावी, अशी मागणी माजी नगराध्यक्ष द्वारकाप्रसाद दुबे यांनी केली आहे.

सध्या पावसाच्या अनिश्चिततेमुळे शेतकरी आधीच आर्थिक संकटात सापडला आहे. पिकांना पाण्याची गरज असताना कृषीपंपांसाठी पुरेशी वीज उपलब्ध होत नसल्याने शेतकऱ्यांच्या अडचणीत भर पडत आहे. अशा परिस्थितीत विजेचा प्रत्येक युनिट काटकसरीने वापरणे आवश्यक आहे. मात्र, शहरातील काही भागांमध्ये दिवसा आणि रात्रीही पथदिवे सुरू राहत असल्याने वीज व्यवस्थापनाबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.

**सकाळी साडेसहा वाजेपर्यंत पथदिवे सुरू**

मुर्तीजापूर नगर परिषदेच्या हद्दीतील अनेक भागांमध्ये सकाळी साडेसहा वाजेपर्यंत पथदिवे सुरू असल्याचेही दुबे यांनी निदर्शनास आणून दिले. रात्री आवश्यक असलेली प्रकाशव्यवस्था पहाटे उजाडल्यानंतरही सुरू राहिल्यास मोठ्या प्रमाणात विजेचा अपव्यय होतो. स्वयंचलित टाइमर, प्रकाश सेन्सर अथवा नियमित तपासणीच्या माध्यमातून ही समस्या सहजपणे दूर करता येऊ शकते. 'छोट्या-छोट्या बाबींकडे लक्ष दिल्यास मोठी बचत' शेतकऱ्यांसाठी होऊ शकते असे दुबे यांनी म्हटले आहे.

# मुर्तीजापुरात कावड उत्सव भक्तीभावाने साजरा

प्रतिनिधी १० सप्टेंबर

**मुर्तीजापूर :** श्रावण महिन्याच्या शेवटच्या सोमवारी मुर्तीजापुर शहर भक्ती, श्रद्धा आणि उत्साहाच्या रंगात न्हाऊन निघाले. लाखपुरी येथील लक्षेश्वर महाराजांना अभिवादन करून नदीचे पवित्र जल कावडीतून खांद्यावर घेत सुमारे १५ किलोमीटरचा पायी प्रवास करीत शिवभक्त मुर्तीजापुरात दाखल झाले. हर हर महादेवच्या जयघोषाने, ढोल-ताशांच्या गजराने, डीजेच्या तालावर आणि दिंडीच्या भक्तिमय वातावरणाने शहरातील रस्ते अक्षरशः दुमदुमून गेले.





आमदार हरीश पिंपळे यांनी कावड यात्रेतील शिवभक्तांचे स्वागत करून कावडीचे पूजन केले. तोलाराम चौक येथे कावड उत्सव समितीचे अध्यक्ष तथा माजी नगरसेवक विनायक गुल्हाने यांच्या पुढाकाराने सहा क्विंटल उसळीचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन आमदार हरीश पिंपळे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शिवभक्तांना उसळीचे वितरण करण्यात आले.

या वेळी आमदार हरीश पिंपळे, उपविभागीय अधिकारी संदीप कुमार, तहसीलदार शिल्पाताई बोबडे नगराध्यक्ष हर्षल साबळे प्रशासनातील अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी वैशाली मुळे, शहर पोलीस ठाण्याचे ठाणेदार धर्मेश जोशी, ग्रामीण पोलीस ठाण्याचे ठाणेदार दीपक महाडिक, मेमन समाजाचे अध्यक्ष इब्राहिम घाणीवाला, निजाम इंजिनियर, समाजसेवक गुलाब दुबे, संभाजी ब्रिगेडचे विभागीय अध्यक्ष संजय गुप्ता, बाळू टाक, दिगंबर गुल्हाने, गणेशराव महल्ले, जितेंद्र गुल्हाने, सविनय गुल्हाने, सुरेंद्र वरोकार, मुन्ना नाईकनवरे यांच्यासह विविध क्षेत्रांतील पदाधिकारी, कार्यकर्ते व शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

माजी ज्येष्ठ नगरसेवक विनायक गुल्हाने यांनी आमदार हरीश पिंपळे तसेच उपस्थित अधिकारी व मान्यवरांचे शाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार अन्वर खान यांनी केले. कावड यात्रेच्या निमित्ताने मुर्तीजापुरातील सामाजिक सलोखा आणि हिंदू-मुस्लिम ऐक्याचे दर्शन घडले. मुस्लिम समाजातील प्रमुख नेते, पदाधिकारी व नागरिकांनी कावड यात्रेत सहभागी झालेल्या शिवभक्तांचे ठिकठिकाणी स्वागत केले. स्टेशन परिसरातील जय माँ चंडिका कावड मंडळाचे अध्यक्ष सचिन देशमुख यांच्या नेतृत्वाखालील कावड यात्रेचे स्वागत करण्यात आले.

# अकोट येथे संत सेना महाराज पुण्यतिथी महोत्सव

## विठ्ठल रुक्मिणी संत सेना महाराज मूर्तीची प्राणप्रतिष्ठा



प्रतिनिधी १० सप्टेंबर

**अकोट :** येथील संत सेना महाराज शैक्षणिक व सामाजिक विकास संस्था व नाभिक समाजाच्या वतीने पुण्यतिथी महोत्सव 5 ते 8 सप्टेंबर पर्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. विधिवत पूजाअर्चा व विठ्ठल रुक्मिणी संत सेना महाराज मूर्तीची प्राणप्रतिष्ठा यज्ञ विधी, भजन कीर्तन करून स्थापन करण्यात आली. शिवाजीनगर येथून श्री चा अभिषेक करून भव्य शोभायात्रा शहरातून काढण्यात आली. महोत्सवात नाभिक समाज बांधवांचा मेळावा संस्थेचे अध्यक्ष संजय भायाणी यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आला. मेळाव्याचे उद्घाटन महाराष्ट्र नाभिक महामंडळाचे प्रदेशाध्यक्ष सयाजीराव झुंजार यांनी केले. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी गटशिक्षणाधिकारी मधुकरराव सूर्यवंशी, दैनिक एकमतचे सोलापूर आवृत्ती प्रमुख संजय येऊलकर, सेवानिवृत्त अभियंता अनंतराव अमृतकर, डॉ गजाननराव महाले, नाभिक समाज महिला मंडळ अध्यक्ष मीना अंबुलकर, सलून दुकान संघटनेचे अध्यक्ष संतोष चोंडेकर यांच्या उपस्थिती संपन्न झाला. याप्रसंगी मूर्ती दाता सौ. रत्नप्रभा अनंतराव अमृतकर, भारत भूषण पुरस्कार प्राप्त अशोकराव उंबरकर, कृतिशील शिक्षक ज्ञानेश्वर खापरकर, सेवानिवृत्त अभियंता राजेश येवुलकर, सेवानिवृत्त तंत्रज्ञ अनिल येऊलकर, पोलीस विभागात पदोन्नती प्राप्त अनिल लापूरकर, रवींद्र अठराळे इतर विभागात नोकरी करिता निवड झालेले सुरज डांगटे, स्वप्निल मानकर, रितेश मोरस्कर, पंकज अंबुलकर, सेवानिवृत्त तलाठी अरुणराव उकळकर, गजानन कळसकर, प्रा सुभाष शिवरामे हरिदास धानोरकर यांचा सपत्निक सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला महाराष्ट्र नाभिक साहित्य दर्पणचे अध्यक्ष मुकुंद धजेकर, श्रीराम अठराळे, राजेंद्र भातुलकर यांची उपस्थिती होती. याप्रसंगी सभागृहात स्व. तात्यासाहेब शिंगणारे यांच्या फोटोचे अनावरण करण्यात आले व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

# अकोटमध्ये दहीहंडी उत्सवाचा जल्लोष

## 'गोविंदा आला रे'च्या जयघोषाने शहर दुमदुमले

वि. प्रतिनिधी १० सप्टेंबर

**अकोट :** श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या पार्श्वभूमीवर अकोट शहरात बुधवारी अहिर गवळी नवयुवक मंडळाच्या वतीने पारंपरिक दहीहंडी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. 'गोविंदा आला रे...'च्या जयघोषाने संपूर्ण शहर दुमदुमले.



उत्सवाची सुरुवात श्री नरसिंग महाराज मंदिरातून करण्यात आली. यावेळी आकर्षक सजवलेल्या रथातून भगवान श्रीकृष्णाची देखणी वेशभूषा साकारण्यात आली होती. रथासह गोविंदा पथकांनी शहरातील प्रमुख मार्गांवरून शोभायात्रा काढत विविध भागांतील दहीहंड्यांना भेट दिली. पारंपरिक ढोल-ताशे, डीजेच्या गजरात आणि जयघोषात ही शोभायात्रा शहरातून मार्गक्रमण करत होती. यंदाच्या दहीहंडी उत्सवात नरसिंग आखाडा, हनुमान आखाडा, ग्वाला ग्रुप आखाडा, वाल्मिकी आखाडा, जय शक्ती आखाडा, श्रीराम आखाडा, संघर्ष आखाडा आणि विठू माऊली आखाडा या गोविंदा पथकांनी सहभाग नोंदविला. कोणत्या पथकाने कोणती दहीहंडी फोडायची याचे नियोजन अहिर गवळी नवयुवक मंडळाच्या कार्यकर्त्यांनी शिस्तबद्ध पद्धतीने केले होते. दरम्यान, सकल मराठा समाजाच्या वतीने क्रेनच्या सहाय्याने उंचावर दहीहंडी बांधण्यात आली होती. या दहीहंडीला ५ हजार १०० रुपयांचे रोख बक्षीस जाहीर करण्यात आले होते.

# पोळा व गणेशोत्सव काळात अवैध दारू विक्री बंद करण्याची मागणी

**हातरुण :** पोळा तसेच आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर उरळ पोलिस स्टेशनच्या हद्दीत अवैध दारू विक्रीला आळा घालण्याची मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे.

सण-उत्सवाच्या काळात मोठ्या प्रमाणात नागरिक एकत्र येत असल्याने कोणत्याही प्रकारे शांतता भंग होऊ नये आणि कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी उरळ पोलिस प्रशासनाने अवैध दारू विक्री करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात येत आहे.पोळा आणि गणेशोत्सव हे सामाजिक सलोखा, बंधुभाव आणि आनंदाचे सण म्हणून साजरे केले जातात. या काळात गावागावांत विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. मात्र, काही ठिकाणी अवैध दारू विक्री सुरू राहिल्यास मद्यपान करून वाद, भांडणे तसेच शांतता भंग होण्याची शक्यता नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

# प्रयास 'कस्तुरी' चा 45 रुग्णांना मिळणार जीवनदृष्टी

## वरखेड (देवदरी) येथे मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर

प्रतिनिधी १० सप्टेंबर

**अकोला :** शहरातील सेवाभावी संस्था 'कस्तुरी' , दमाणी नेत्र रुग्णालय , रोटरी क्लब ऑफ बॉम्बे हँगिंग गार्डन, मुंबई व भगवान बाबा विद्यालय , वरखेड (देवदरी ) यांच्या संयुक्त विद्यमाने वरखेड येथे दि. ८ सप्टेंबर २६ रोजी मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर संपन्न झाले..या शिबिरात



वरखेड , देवदरी ,चिंचोली, चिंचखेड ,धोतरखेड, टीटवण, हतडोली, कोथळी, माळेगाव व धानोरा मुंगशी , इ. गावांमधील १७१ गरजू रुग्णांची नेत्र तपासणी होऊन ४५ रुग्णांमध्ये मोतीबिंदू चा विकार आढळून आल्यामुळे अशा रुग्णांवर येथील दमानी नेत्र रुग्णालयात टप्प्याटप्प्याने मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येतील. याच शिबिरात ४५ गरजू रुग्णांना जवळच्या नंबरचे बायफोकल चष्मे अल्पदरात उपलब्ध करून दिले.

शिबिराचे उद्घाटन ' कस्तूरी' चे संस्थापक अध्यक्ष प्रा.ॲड. किशोर बुटोले यांचे हस्ते करण्यात आले. याप्रसंगी प्रा.किशोर बुटोले यांनी कस्तुरी या संस्थेद्वारे समाजातील वंचित व दुर्बल घटकांसाठी मागील १६ वर्षापासून राबविलेल्या विविध सेवाभावी उपक्रमाचा आढावा घेतला.. शेगावीचे श्री संत गजानन महाराज, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, आणि वैराग्यमूर्ती गाडगेबाबा यांनी दिलेल्या शिकवणीचा प्रत्यक्ष अंगीकार सेवाकार्याच्या माध्यमातून कस्तुरी सातत्याने करत असल्याचे प्रतिपादन केले.

याप्रसंगी सत्य साई सेवा समिती अकोला या सेवाभावी संस्थेद्वारे नेत्र रुग्णांना मोफत औषध वितरण करण्यात आले. माजीआमदार वसंतराव खोटरे यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमात व्यासपीठावर वरखेडच्या सरपंच सौ.वर्षा राठोड , भगवान बाबा विद्यालयाचे मुख्याध्यापक जयवंतराव सानप, जिल्हा पेन्शनर्स असोसिएशनचे सचिव एकनाथराव उके व दमानी नेत्र रुग्णालयाचे डॉ.सौरभ इंगोले, अजय देशमुख उपस्थित होते. वसंतराव खोटरे यांनी कस्तुरीचा सेवाभाव विषद करून उपस्थित रुग्णांना शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी दमाणी रुग्णालयाचे डॉ. सौरभ इंगोले, अजय देशमुख , चंचल लोखंडे , सत्यसांई सेवा संघटनेचे सुनील सरोदे, कस्तुरीचे सचिव व प्रकल्प प्रमुख संजय ठाकरे , सह प्रकल्प प्रमुख अनिल पालवे , दीपक झाडे , नरेंद्र देवघरे,सौ . मीरा देशपांडे , श्रीमती अनिता इधोळ, संजय बुटोले, श्री दामोदर नुपे, किशोर बांधवकर इ. नी प्रयत्न केले.. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कस्तुरीचे सचिव संजय ठाकरे यांनी तर आभार अनिता इधोळ यांनी मानले.

# नूतन विद्यालयात शिष्यवृत्ती व सायकल वाटप

प्रतिनिधी १० सप्टेंबर

**आलेगाव :** नूतन विद्यालयात शिष्यवृत्ती व सायकलचे विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले. अध्यक्षस्थानी संस्थेचे जेष्ठ सदस्य नानासाहेब देशमुख तसेच प्रमुख अतिथी म्हणून गटविकास अधिकारी प्रदीप गुजर व प्रवीण डाबेराव गटशिक्षणाधिकारी, निळकंठ बशेट्टी माजी केंद्रप्रमुख, सुहास झोड, अक्षय जैन अध्यक्ष नूतन विद्यालय, राधेश्याम शर्मा उपाध्यक्ष, मयूर जैन, खजिनदार, सुधाकर कराळे सरपंचपती दिग्रस बुद्रुक सत्कारमूर्ती जितेंद्र कुमार थोरात , सौ. थोरात, पद्माकर पातोडे व सौ. पातोडे उपस्थित होते



मान्यवरांच्या हस्ते सरस्वतीचे पूजन करून संस्थेच्या वतीने सत्कारमूर्ती थोरात व पद्माकर पातोडे यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. बायोस्टेट कंपनी द्वारे सामान्य ज्ञान स्पर्धे घेण्यात आली. त्यामधून पुरस्कार प्राप्त दहा विद्यार्थ्यांना भेटवस्तू देऊन त्यांचा गुणगौरव करण्यात आला. बायोस्टेट कंपनीचे डीएम सुहास झोड यांनी विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप दिली. दहा विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप वाटण्यात आली

बायोस्टेट कंपनी कडून उत्कृष्ट कार्य करणाऱ्या दहा शेतक-यांचा भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला त्यामध्ये दत्तात्रय म्हस्के, मंगेश गाडेकर चरणगाव, शंकर सरोदे कारला, जय गोपालदायी आलेगाव, मंगेश इंगळे आलेगाव, पांडुरंग घायवट जाम, नावेद खान आलेगाव, अशोक आवटे आलेगाव, अशोक लाहोळे अंबाशी होते. अर्हम ग्रुप द्वारे व जैन मुनी यांच्या प्रेरणेने गरजवंत होतकरू हुशार विद्यार्थ्यांना 80 विद्यार्थ्यांना सायकलीचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी मंगल सेठ बाफना, घनश्याम गोयल, पत्रकार कदिर भाई पत्रकार, इमरान, कांतीलाल जैन, नय्यर खान, श्रीधर लाड, सौ. किसनाबाई शिंदे, गणेश गाडेकर, सुदेशराव देशमुख, बबनराव काळदाते, संजय काळपांडे ,संजय महल्ले, अब्दुल जफर पत्रकार, विजय अप्पाडोंगरे उपस्थित होते.

सत्कारमूर्ती जितेंद्र कुमार थोरात यांनी संस्थेचे व विद्यालयाचे आभार मानले. कार्यक्रमाचे संचालन प्राध्यापक खैरे यांनी केले. नूतन विद्यालयाद्वारे या प्रकारची सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या कार्यक्रमाद्वारे बहुजन समाजातील गोरगरीब विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे कार्य संस्थेद्वारे मोठ्या उत्साहाने केले जाते

या कार्यक्रमाकरिता नूतन विद्यालयाचे प्राचार्य राठोड, पर्यवेक्षक माळी तसेच सर्व शिक्षक शिक्षिका कर्मचारी आणि जैन साध्वी प्रभा प्रकाश कॉन्व्हेंट प्राचार्य महावीर सर व सर्व शिक्षक कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## निधन वार्ता

**मनोहर मुंडलिक**



**बाळापूर :** येथील सावता माळी नगरातील रहिवासी संतोष व अविनाश मुंडलिक यांचे वडिल मनोहर त्र्यंबक मुंडलिक (८८) यांचे वृद्धपकाळाने सोमवारी निधन झाले. त्यांच्या मागे दोन मुले, एक मुलगी आणि मोठा आप्त परिवार आहे.

**शालिग्राम मोरे**



**बाळापूर :** गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर रजत मोरे यांचे वडील शालिग्राम राजाराम मोरे (६२) गुजराथीपूरा यांचे अल्पशा आजाराने ७ रोजी निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, दोन मुले आणि मोठा आप्त परिवार आहे.

**विठ्ठलराव मालगे**



**अकोला :** येथील पोळा चौकातील रहिवासी विठ्ठलराव दयारामजी मालगे यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात शिवसेनेचे अनिल आणि आशिष मालगे ही मुले आणि मोठा आप्त परिवार आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
गुरुवार, दि. १० सप्टेंबर २०२६ https://epaper.citynewssuperfast.com

# हलबा-हलबी समाजाच्या जातवैधता प्रमाणपत्रांच्या पुनर्विलोकनाला उच्च न्यायालयात आव्हान

## हलबी आदिम जमात मंडळाची याचिका : शासनाला उत्तर दाखल करण्याची नोटीस

प्रतिनिधी १० सप्टेंबर

**यवतमाळ :** महाराष्ट्र शासनाने २२ जुलै २०२६ रोजी जात प्रमाणपत्र देणे व त्याच्या पडताळणीची प्रक्रिया नियंत्रित करणाऱ्या कायद्यात केलेल्या सुधारणांतील काही तरतुदींना हलबा-हलबी समाजाच्या वतीने मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात आव्हान देण्यात आले आहे. या याचिकेवर बुधवारी, ९ सप्टेंबर रोजी झालेल्या सुनावणीत न्यायालयाने शासनाला नोटीस बजावून उत्तर दाखल करण्याचे निर्देश दिले.

ढाणकी येथील हलबी आदिम जमात मंडळाचे अध्यक्ष अनिल कुसरे यांनी अधिवक्ता अश्विन देशपांडे यांच्यामार्फत ही याचिका दाखल केली आहे. शासनाच्या नव्या सुधारणेनुसार नियम ६-क अंतर्गत जात पडताळणी समितीला काही विशिष्ट परिस्थितीत यापूर्वी दिलेल्या जातवैधता प्रमाणपत्रांचे स्वाधिकाराने पुनर्विलोकन करण्याचा अधिकार देण्यात आला आहे. एखाद्या व्यक्तीच्या जातदाव्याविरोधात प्रतिकूल पुरावा आढळल्यास, रक्ताच्या नातेवाईकांनी फसवणूक करून अथवा महत्त्वाची तथ्ये लपवून वैधता मिळविल्याचे निदर्शनास आल्यास, तसेच वैधता प्रमाणपत्र देताना महत्त्वाच्या पुराव्याकडे दुर्लक्ष झाल्याचे किंवा चौकशी प्रक्रियेत त्रुटी आढळल्यास पुनर्विलोकन करता येणार आहे.

### ‘समाजहितासाठी कायदेशीर लढा सुरूच ठेवणार’

■ “हलबा-हलबी समाजातील नागरिकांच्या जातवैधता प्रमाणपत्राबाबत अनिश्चितता निर्माण होऊ नये आणि कायदेशीर प्रक्रियेतून मिळालेल्या वैधतेचे संरक्षण व्हावे, या भूमिकेतून न्यायालयात दाद मागितली आहे. समाजाच्या हितासाठी ही कायदेशीर लढाई पुढेही ठामपणे सुरू ठेवणार आहोत.”
- अनिल कुसरे, अध्यक्ष, हलबी आदिम जमात मंडळ, ढाणकी

या प्रक्रियेत संबंधित व्यक्तीला आपले म्हणणे मांडण्याची संधी देणे बंधनकारक आहे. मात्र, पुनर्विलोकनानंतर समितीला वैधता प्रमाणपत्र कायम ठेवण्यासोबतच जात प्रमाणपत्र व जातवैधता प्रमाणपत्र रद्द करून ते जप्त करण्याचाही अधिकार देण्यात आला आहे.

दरम्यान, नियम ६-ख अंतर्गत पडताळणी समितीच्या आदेशाने व्यथित झालेल्या व्यक्तीला शासनाने निर्दिष्ट केलेल्या अपील प्राधिकरणाकडे ९० दिवसांच्या आत अपील करण्याची तरतूद करण्यात आली आहे. अपील प्राधिकरणाने साधारण तीन महिन्यांत निर्णय देणे अपेक्षित असून, त्यानंतरच्या आदेशाला अंतिम स्वरूप देण्यात आले आहे. या तरतुदींनाही याचिकेत आव्हान देण्यात आले आहे.

नव्या सुधारणांमुळे यापूर्वी कायदेशीर प्रक्रियेतून प्राप्त झालेल्या जातवैधता प्रमाणपत्रांच्या पुनर्विलोकनाचा मार्ग खुला झाल्याचा याचिकाकर्त्यांचा दावा आहे. या तरतुदींची घटनात्मक वैधता आणि नागरिकांच्या अधिकारांवरील परिणाम याबाबत न्यायालयीन परीक्षणाची मागणी करण्यात आली आहे. शासनाला नोटीस बजावण्यात आल्याने या प्रकरणाच्या पुढील सुनावणीकडे हलबा-हलबी समाजासह जातवैधता प्रमाणपत्रधारकांचे लक्ष लागले आहे.

### ‘अधिकारांचे संरक्षण व्हावे’

■ “नव्या सुधारणांमुळे यापूर्वी कायदेशीर प्रक्रियेतून प्राप्त झालेल्या जातवैधता प्रमाणपत्रांच्या पुनर्विलोकनाचा प्रश्न निर्माण झाला आहे. या तरतुदींची घटनात्मक वैधता आणि नागरिकांच्या अधिकारांवरील परिणाम याबाबत उच्च न्यायालयासमोर भूमिका मांडली आहे. शासनाचे म्हणणे ऐकून न्यायालय योग्य तो निर्णय घेईल.”
- ॲड. अश्विन देशपांडे, अधिवक्ता, उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ

# बाभूळगाव तालुक्यात ३२ ग्रामपंचायतींवर महिलाराज

## ग्रामपंचायत निवडणुकीसाठी आरक्षण सोडत जाहीर

प्रतिनिधी १० सप्टेंबर

**बाभूळगाव :** आगामी ग्रामपंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बाभूळगाव तालुक्यातील ६४ ग्रामपंचायतींच्या सरपंचपदासाठी आरक्षण सोडत गुरुवारी तहसील कार्यालयात काढण्यात आली. या आरक्षण सोडतीत तब्बल ३२ ग्रामपंचायतींचे सरपंचपद महिलांसाठी राखीव झाले असून, तालुक्यातील निम्म्या ग्रामपंचायतींवर महिलांना नेतृत्वाची संधी मिळणार आहे.

अनुसूचित जाती प्रवर्गासाठी फत्तेपूर (पु.), फाळेगाव, कोंढा आणि राणी अमरावती या ग्रामपंचायतींची निवड झाली. याच प्रवर्गातील महिला आरक्षणासाठी घारफळ, यरणगाव, गवंडी आणि सावंगी मांग या ग्रामपंचायतींचे आरक्षण निश्चित झाले.

अनुसूचित जमाती प्रवर्गात कोठा अलीपूर, कोपरा-१ पुनर्वसन, बारड पुनर्वसन, यावली, पंचगव्हाण आणि आष्टारामपूर यांचा समावेश आहे. महिला आरक्षणासाठी महम्मदपूर, विरखेड, मादणी आणि बोरगाव भिलुक्षा या ग्रामपंचायती राखीव झाल्या. ईश्वर चिठ्ठीद्वारे पिंप्री (ई.), आलेगाव या ग्रामपंचायतींची निवड झाली.

नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी नांदुरा खुर्द, नायगाव, दाभा, मुबारकपूर आणि खडकसावंगा या ग्रामपंचायतींचे आरक्षण झाले. महिला आरक्षणासाठी करळगाव-पिंपळखुटा, वरूड, वाटखेड बु., गिमोणा, नागरगाव आणि पहूर या ग्रामपंचायती राखीव झाल्या.

सर्वसाधारण प्रवर्गात खर्डा, परसोडी, शिंदी, सारफळी-माहुली, तांबा, गणोरी, चिमणापूर, कोपरा जानकर, सुकळी भटमार्ग पु., वेणी, मिटणापूर, चोंढी, सावर आणि सरूळ यांचा समावेश आहे. महिला आरक्षणासाठी नांदुरा बु., टाकळगाव, लोणी, मालापूर पु., मानकापूर-देवगाव, कोटंबा, दिघी-२ पु., आसेगाव देवी, गळव्हा, डेहणी, गोंधळी, वाटखेड खु., उमरी आणि नांदेसावंगी या ग्रामपंचायती राखीव झाल्या.

आरक्षण सोडतीच्या वेळी निवडणूक विभागाचे उपजिल्हाधिकारी अविनाश शिंगटे, तहसीलदार मीरा पागोरे, नायब तहसीलदार (निवडणूक) आय. एम. कांबळे, महसूल सहाय्यक सुजाता तायडे आणि संगणक परिचालक अमित मोगरकर उपस्थित होते.

ईश्वर चिठ्ठीद्वारे आरक्षण निश्चित करण्याची प्रक्रिया पूजा सहारे यांच्या हस्ते पार पडली.

# कावड यात्रेच्या सेवाभावी हातांचा गौरव

प्रतिनिधी १० सप्टेंबर



**आर्णी :** धार्मिक उत्साहासोबतच सामाजिक बांधिलकी जपत कावड यात्रा यशस्वी करण्यासाठी योगदान देणाऱ्या सेवाभावींचा आणि उत्कृष्ट रील सादर करणाऱ्या विजेत्यांचा श्री सिद्धेश्वर महादेव मंदिर कावड यात्रा समिती व विश्व हिंदू परिषद बजरंग दलाच्या वतीने गौरव करण्यात आला. बुधवारी (दि. ९) सायंकाळी झालेल्या कार्यक्रमात विजेत्यांना पारितोषिक व सन्मानपत्र प्रदान करण्यात आले.

कावड यात्रेतील विविध क्षणांचे कल्पक चित्रण करणाऱ्या रील स्पर्धेत कृष्णा खोब्रागडे यांनी प्रथम क्रमांक मिळविला. त्यांना ३ हजार १ रुपयांचे रोख पारितोषिक देण्यात आले. वैभव गव्हाणे यांनी द्वितीय, तर शारवेद नामपल्लीवार यांनी तृतीय क्रमांक पटकावला. याशिवाय वैभव गिलबिले, गौरव पिट्टलवार, मंगेश बनसोडे, अंकित ठाकरे, दिनेश भागवत, ऋषिया क्रिएशन आणि पार्थ चौधरी यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

कावड यात्रेच्या नियोजनात प्रत्यक्ष सेवा देणाऱ्यांचाही यावेळी गौरव करण्यात आला. कपिल ठाकरे यांनी फळे व पाणी वाटपाची सेवा केली. सागर अस्वार यांनी स्वखर्चातून विद्युत व्यवस्था केली. छत्रपती कावड यात्रा समिती आणि श्रीराम नवमी कावड यात्रा समिती, जवळा यांनी आवश्यक साहित्य उपलब्ध करून दिले.

विशाल शिरसागर व तुषार बनकर यांनी रुग्णवाहिका सुविधा उपलब्ध करून दिली. विकास ठमके, विठ्ठल जाधव, वैभव गव्हाणे आणि विशाल मोरे यांनी पाणीपुरवठ्याची जबाबदारी सांभाळली. अमोल मंदेवाड यांनी स्वतःचे वाहन व इंधन उपलब्ध करून देत यात्रेसाठी सहकार्य केले.

कावड यात्रा ही धार्मिक परंपरेसोबतच सेवा, सहकार्य आणि सामाजिक एकतेचे दर्शन घडविणारा उपक्रम असल्याचे यावेळी उपस्थितांनी नमूद केले.

# कत्तलीसाठी नेणाऱ्या दोन गोवंशांची सुटका

प्रतिनिधी १० सप्टेंबर

**उमरखेड :** महागावकडून उमरखेडच्या दिशेने कत्तलीसाठी गोवंशीय जनावरांची क्रूरपणे वाहतूक केली जात असल्याची गोपनीय माहिती मिळाल्यानंतर उमरखेड पोलिसांनी कारवाई करत दोन गोवंशीय जनावरांची सुटका केली. या कारवाईत टाटा एस वाहनासह सुमारे १ लाख ७६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. दि. ८ सप्टेंबर रोजी पोलिसांना महागावकडून उमरखेडच्या दिशेने टाटा एस वाहनातून गोवंशीय जनावरे कत्तलीसाठी नेली जात असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर पोलिसांनी ढाणकी मार्गावरील उड्डाणपुलाजवळ नाकाबंदी केली. यावेळी महागावच्या दिशेने येणारे एमएच २९ टी ६०३३ क्रमांकाचे टाटा एस वाहन पोलिसांनी थांबवून तपासले. वाहनाची झडती घेतली असता त्यामध्ये एक गाय आणि एक वासरू आढळून आले. दोन्ही जनावरांना अत्यंत कमी जागेत कोंबून ठेवण्यात आले होते. त्यांना हालचाल करण्यासाठी पुरेशी जागा नव्हती तसेच चारा व पाण्याची कोणतीही व्यवस्था करण्यात आली नसल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले.

त्यामुळे जनावरांची क्रूरपणे वाहतूक करून त्यांना कत्तलीसाठी नेले जात असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला. या प्रकरणी अतुल सुभाषराव मुटकुळे (वय ३६, रा. वरूड बीबी, ता. उमरखेड) याच्याविरुद्ध उमरखेड पोलीस ठाण्यात प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम तसेच महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियमातील कलम ५(अ), ५(ब) आणि ९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुटका करण्यात आलेल्या दोन्ही गोवंशीय जनावरांना सुरक्षितता, चारा व पाण्याची योग्य व्यवस्था करण्यासाठी गोशाळेत दाखल करण्यात आले आहे.

# सण-उत्सवाच्या पार्श्वभूमीवर शांतता समितीची बैठक

प्रतिनिधी १० सप्टेंबर



**कळंब :** आगामी सण-उत्सव शांततेत व उत्साहात पार पडावेत, यासाठी कळंब पोलिस ठाण्याच्या वतीने डोंगरखर्डा पोलिस चौकीत शांतता समिती सदस्य व विविध मंडळांच्या पदाधिकाऱ्यांची संयुक्त बैठक घेण्यात आली. बैठकीला पोलिस निरीक्षक धनराज निळे, उपविभागीय पोलिस अधिकारी अमोल कोळी यांच्यासह विविध समाजांतील नागरिक व लोकप्रतिनिधी उपस्थित होते. उत्सवाचा आनंद घेताना कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. सामाजिक माध्यमांवरील अफवांवर विश्वास न ठेवता कोणताही अनुचित प्रकार आढळल्यास तत्काळ पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिस प्रशासनाने केले.

यावेळी ध्वनिक्षेपकाच्या मर्यादांचे पालन, पारंपरिक वाद्यांना प्रोत्साहन, मिरवणुकीदरम्यान वाहतुकीस अडथळा निर्माण होणार नाही याची दक्षता तसेच पर्यावरणपूरक पद्धतीने सण साजरे करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. बैठकीनंतर उपविभागीय पोलिस अधिकारी अमोल कोळी यांनी गावातील मिरवणूक मार्गाची पाहणी केली. विविध समाजांतील नागरिकांशी संवाद साधून उत्सवाच्या तयारीची माहिती घेतली. तसेच शांतता व सुव्यवस्था राखण्याबाबत आवश्यक सूचना केल्या. नागरिकांनीही पोलिस प्रशासनाला सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

# निमणी ग्रामपंचायतीच्या कारभाराची चौकशी करण्याची मागणी

प्रतिनिधी १० सप्टेंबर



**झरी-जामणी :** तालुक्यातील गट ग्रामपंचायत निमणीच्या सरपंचांविरोधात ग्रामस्थांनी विविध आरोप करीत ग्रामपंचायतीच्या विकासकामांसह निधीच्या वापराची सखोल चौकशी करण्याची मागणी गटविकास अधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

गेल्या साडेतीन वर्षांपासून सरपंच गावात नियमित वास्तव्यास नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. तसेच निमणी व दरारा या गावांतील रस्ते, नाली, पाणीपुरवठा यांसह मूलभूत विकासकामांकडे दुर्लक्ष झाल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. ७ सप्टेंबर रोजी ग्रामस्थांनी विकासकामांबाबत सरपंचांकडे विचारणा केली; मात्र समाधानकारक माहिती मिळाली नसल्याचे त्यांचे म्हणणे आहे.

ग्रामपंचायतीला १५वा वित्त आयोग, मनरेगा, तांडा वस्ती, दलित वस्ती आदी योजनांतून मिळालेल्या निधीचा संपूर्ण तपशील आणि त्यातून झालेल्या कामांची माहिती ग्रामस्थांसमोर जाहीर करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. निधीच्या वापरात गैरप्रकार अथवा अपहार आढळल्यास सरपंच, ग्रामसेवक व संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, अशीही मागणी आहे.

सरपंच गावात वास्तव्यास नसल्याच्या आरोपाची तसेच रास्त भाव दुकानाच्या कामकाजात पदाचा गैरवापर झाला आहे का, याचीही चौकशी करण्याची मागणी करण्यात आली.

रविंद्र सो. कुमरे, आलेश कुमार मडावी, आकाश गेडाम, सुधाकर कुडमंते, राहुल कुडमंते, उमेश कुमरे, देविदास मडावी, विजय कुडमंते आणि राजू कुडमंते यांनी निवेदनावर स्वाक्षऱ्या केल्या आहेत.

# जनता दरबारात २०० लाडक्या बहिणी, १० प्रकल्पग्रस्तांच्या समस्या

प्रतिनिधी १० सप्टेंबर



**पुसद :** यवतमाळ जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने धरणग्रस्त, प्रकल्पग्रस्त नागरिक तसेच मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थींच्या प्रलंबित समस्या जाणून घेण्यासाठी आयोजित जनता दरबारात पुसद तालुक्यातील २०० लाडक्या बहिणी आणि १० प्रकल्पग्रस्त नागरिकांच्या समस्या मांडण्यात आल्या. संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांनी काही प्रश्नांवर तत्काळ कार्यवाही केली, तर उर्वरित प्रश्न येत्या आठवडाभरात मार्गी लावण्याचे आश्वासन दिले.

प्रदेश काँग्रेस सरचिटणीस डॉ. मोहम्मद नदीम यांच्या मार्गदर्शनाखाली तालुका काँग्रेस अध्यक्ष ज्ञानदीप कांबळे, शहर अध्यक्ष झिया शेख, युवक जिल्हा महासचिव सुजित मानकामे, विधानसभा अध्यक्ष अभिलाष खैरमोडे, महिला अध्यक्षा योगिता नेमायते, दलित आघाडी अध्यक्ष ॲड. पद्माकर विघ्ने, युवक काँग्रेसचे नईम इजारदार आणि रहेमान चव्हाण यांनी गावभेटी व जनसंपर्काच्या माध्यमातून नागरिकांच्या समस्या संकलित करून जनता दरबारात मांडल्या.

बेंबळा, निम्न पैनगंगा, इसापूर, अमडापूर आणि पुस धरण प्रकल्पांशी संबंधित नागरिकांनी भूखंड वाटप, पाण्याची पातळी कमी झाल्यानंतर शेती करण्यास परवानगी, प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्रातील अडचणी, पाच टक्के प्रकल्पग्रस्त आरक्षणातून नोकरी, पुनर्वसन गावांतील नागरी सुविधा, भूसंपादनाचा वाढीव मोबदला आणि न्यायालयीन प्रकरणांतील मोबदला यांसह विविध समस्या मांडल्या. ई-कॅनॉलसाठी झालेल्या भूसंपादनामुळे निर्माण झालेल्या अडचणींचाही मुद्दा उपस्थित करण्यात आला.

प्रकल्पग्रस्त शेतकरी ज्या जमिनीची लागवड करीत आहेत, त्या जमिनीवर वनीकरण किंवा सौरऊर्जा प्रकल्प राबवू नयेत, अशी मागणीही करण्यात आली. न्यायालयाचा निर्णय शेतकऱ्यांच्या बाजूने लागल्यानंतरही काही प्रकरणांत मोबदला मिळत नसल्याचे अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून देण्यात आले.

“प्रकल्पग्रस्त तसेच लाडकी बहीण योजनेतील अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. संबंधित विभागांकडून हे प्रश्न वेळेत सोडवून घेण्यासाठी जिल्हा काँग्रेस कमिटी सातत्याने पाठपुरावा करणार आहे,” असे जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष ॲड. सचिन नाईक यांनी सांगितले. जनता दरबाराला महिला व बालविकास विभागाचे अतुल सहारे, वैशाली रोंगे, नितेश मोहिते, निम्न पैनगंगा प्रकल्प विभागाचे मधुकर चवलेवार, विवेक वानखडे, जिल्हा पुनर्वसन विभागाचे व्ही. बी. कांडेकर, ए. बी. काळे, पी. आर. उरकुडे, एस. एस. कौसर, बेंबळा पाटबंधारे विभागाचे कनिष्ठ अभियंता प्र. सु. उभाळे, अतिश इंगोले, यवतमाळ प्रकल्प बांधकाम विभागाचे निलेश करे यांच्यासह काँग्रेस पदाधिकारी, कार्यकर्ते, प्रकल्पग्रस्त नागरिक आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# पांढरकवडा-झरी रस्त्याच्या दुरुस्तीला सुरुवात

प्रतिनिधी १० सप्टेंबर



**झरी-जामणी :** पांढरकवडा-झरी मार्गाच्या दुरवस्थेबाबत प्रसिद्ध झालेल्या वृत्ताची सार्वजनिक बांधकाम विभागाने दखल घेतली आहे. रस्त्याच्या दुरुस्तीच्या कामाला १ सप्टेंबर २०२६ पासून प्रत्यक्ष सुरुवात करण्यात आली आहे.

या मार्गावर ठिकठिकाणी रस्त्याची अवस्था खराब झाल्याने वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. रस्त्यावरील खड्डे आणि खराब झालेल्या भागामुळे अपघाताचा धोका निर्माण झाला होता. याबाबत नागरिकांच्या समस्येला वाचा फोडणारे वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाने दखल घेत काम सुरू केले.

रस्त्याच्या दुरुस्तीचे काम सुरू झाल्याने परिसरातील नागरिक व वाहनचालकांकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे. दुरुस्तीचे काम दर्जेदार पद्धतीने आणि वेळेत पूर्ण करावे, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# डीजेमुक्त गणेशोत्सव साजरा करा

## कायदा मोडणाऱ्यांवर कठोर कारवाई : पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांचा इशारा

प्रतिनिधी १० सप्टेंबर



**उमरखेड :** आगामी पोळा, तान्हापोळा, गणेशोत्सव आणि दुर्गादेवी उत्सवाच्या पार्श्वभूमीवर उमरखेड येथे बुधवार, दि. ९ सप्टेंबर रोजी शांतता समितीची बैठक पार पडली. छत्रपती संभाजी महाराज उद्यानातील सभागृहात झालेल्या बैठकीत उत्सव काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासह सामाजिक सलोखा कायम राखण्याबाबत चर्चा करण्यात आली.

“यंदाचा गणेशोत्सव डीजेमुक्त आणि शांततेत साजरा करा. उत्सवाच्या नावाखाली कायदा व सुव्यवस्था बिघडविण्याचा प्रयत्न करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल,” असा इशारा जिल्हा पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांनी दिला.

उमरखेड शहरासह ग्रामीण भागातील समाजकंटकांच्या हालचालींवर पोलिसांची करडी नजर राहणार आहे. मिरवणुकांमध्ये ध्वनिप्रदूषण होणार नाही, याची मंडळांनी दक्षता घ्यावी. प्रशासनाने घालून दिलेल्या नियमांचे काटेकोर पालन करावे, अशा सूचना देण्यात आल्या.

उत्सव काळात अफवांवर विश्वास न ठेवता नागरिकांनी सामाजिक सलोखा कायम ठेवावा. समाजमाध्यमांवरील अफवांपासून सावध राहावे तसेच कोणताही संशयास्पद प्रकार आढळल्यास तत्काळ पोलिसांना माहिती द्यावी, असे आवाहन करण्यात आले.

बैठकीला अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, सहाय्यक पोलीस अधीक्षक गौरव पाटील कायदे, आमदार किसनराव वानखेडे, माजी आमदार उत्तमराव इंगळे, शिवसेना नेते साहेबराव कांबळे, नगराध्यक्षा तेजश्री जैन, नितीन भुतडा यांच्यासह पोलीस अधिकारी, शांतता समितीचे सदस्य व नागरिक उपस्थित होते.

महागावचे ठाणेदार सेवानंद वानखेडे, पोफाळीचे ठाणेदार निलेश शेंबडे, बिटगावचे ठाणेदार पांडुरंग शिंदे व दराटीचे ठाणेदारही उपस्थित होते. तालुक्यातील पोलीस पाटील, सामाजिक कार्यकर्ते, गणेश मंडळांचे अध्यक्ष आणि विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले.

बैठकीचे सूत्रसंचालन पोलीस उपनिरीक्षक अमोल गुंडे यांनी केले. प्रास्ताविक पोलीस निरीक्षक शंकर पांचाळ यांनी केले, तर विनोद रामोड यांनी आभार मानले.

# दहीहंडीच्या उत्सवातून सामाजिक बांधिलकी

## कावड यात्रेतील मृत युवकाच्या कुटुंबाला एक लाखांची मदत

प्रतिनिधी १० सप्टेंबर



**उमरखेड :** उत्सवाच्या आनंदासोबत सामाजिक बांधिलकी जपत स्व. प्रमोद महाजन चॅरिटेबल ट्रस्ट आणि स्व. बंकटलाल भुतडा चॅरिटेबल ट्रस्टने कावड यात्रेदरम्यान मृत्यू झालेल्या शिवभक्त युवकाच्या कुटुंबाला एक लाख रुपयांची मदत करण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबतची माहिती ट्रस्टचे नितीन भुतडा यांनी बुधवारी (दि. ९) कृषी उत्पन्न बाजार समिती येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

उमरखेड येथून कावड यात्रेसाठी गेलेल्या शिवभक्त युवकावर काळाने घाला घातला. या दुर्दैवी घटनेने कुटुंबावर ओढवलेल्या संकटाबद्दल संवेदना व्यक्त करत ट्रस्टच्या माध्यमातून आर्थिक मदत करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे नितीन भुतडा यांनी सांगितले.

यंदा पावसाने पाठ फिरवल्याने शेतकऱ्यांसमोर दुष्काळाचे संकट निर्माण झाले आहे. या परिस्थितीत बळीराजाला अडचणीतून बाहेर काढण्यासाठी दोन्ही ट्रस्टच्या माध्यमातून मदतीचे उपक्रम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. शेतकऱ्यांच्या अडचणी लक्षात घेऊन शक्य ते सहकार्य करण्याचा प्रयत्न केला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

कावड यात्रेतील दुर्दैवी घटनेची संवेदना कायम ठेवत विदर्भात नावलौकिक असलेली उमरखेडची दहीहंडी महोत्सवाची परंपरा यंदाही खंडित होऊ दिली जाणार नाही. नियोजित तारीख व वेळेनुसार दहीहंडी महोत्सव साजरा करण्यात येणार असल्याचे पत्रकार परिषदेत सांगण्यात आले.

यावेळी आमदार किसनराव वानखेडे, भाजप गटनेते विजय हारडपर, नगरसेवक गोपाल कलाने यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांचा शुक्रवारी दौरा

**अमरावती:** सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्वजनिक उपक्रम वगळून) शिवेंद्रराजे भोसले शुक्रवार, दि. 11 सप्टेंबर रोजी जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहेत. दौऱ्यानुसार, मंत्री श्री. भोसले हे दि. 11 सप्टेंबर रोजी सकाळी 11 वाजता अमरावतीतील यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या मागील 'सारथी' इमारतीच्या कामाची पाहणी करतील. त्यानंतर वलगाव-रेवसा-कठोरा-नांदगावपेठ रस्ता काँक्रीटीकरण करणे कामाची आणि राजकमल चौकातील बडनेरा-अमरावती रेल्वे मार्गावरील उड्डाणपुलाची पाहणी करतील. दुपारी 3 वाजता सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभागाची शासकीय विश्रामगृहात आढावा बैठक घेतील. त्यानंतर सायंकाळी 6 वाजता नागपूरकडे प्रयाण करतील.

# आरोग्य उपसंचालक, सिव्हील सर्जनसह 5 अधिकारी निलंबित

### कारवाईचा डोस : सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारीही रडारवर

प्रतिनिधी १० सप्टेंबर



**अमरावती :** येथील जिल्हा स्त्री रुग्णालयात (डफरिन) २४ ऑगस्ट रोजी पहाटे नवजात शिशू निगा कक्षात घडलेल्या भीषण अग्निकांडाच्या दुर्घटनेप्रकरणी आरोग्य आयुक्त संजय काटकर यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय चौकशी समितीने शासनाला अहवाल सादर केला. या अहवालाच्या आधारे आरोग्य उपसंचालक डॉ. सुशीलकुमार वाकचौरे, जिल्हा शल्य चिकित्सक व प्रभारी वैद्यकीय अधीक्षक (डफरीन) डॉ. विनोद पवार, अतिरिक्त सीएस डॉ. अरुण साळुंके, प्रशासकीय अधिकारी संदीप तारगे तसेच एका इलेक्ट्रिशियनवर ठपका ठेवत शासनाने बुधवारी निलंबित केले

२४ ऑगस्ट रोजी पहाटे ३ ते ३.३० च्या दरम्यान डफरिन रुग्णालयातील एसएनसीयूच्या 'आऊटबॉर्न' विभागात अचानक आग लागली. त्यावेळी संपूर्ण 'एसएनसीयू' मध्ये ३९ नवजात बालके भरती होती. आऊटबॉर्न युनिटमधील व्हेंटिलेटरमध्ये अचानक स्फोट होऊन ही आग भडकली. या दुर्घटनेत तीन बालकांचा दुर्दैवी मृत्यू झाला. शासन नियुक्त ११ सदस्यीय समितीने घटनास्थळाची पाहणी, चौकशी, संबंधितांचे जबाब नोंदविले व २६ पानांचा अहवाल सोमवारी सचिवांना व मंगळवारी आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांना सादर केला. शासन नियुक्त समितीमध्ये पहिल्यांदा एका अशासकीय सदस्याचा समावेश करण्यात आला आहे उच्चस्तरीय चौकशी समितीच्या अहवालात रुग्णालय प्रशासन, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि उपकरण पुरवठादार कंपनी यांच्यावर गंभीर ठपका ठेवला होता.

, या दुर्घटनेनंतर राज्यातील सर्व शासकीय रुग्णालयांमध्ये अग्निसुरक्षा, विद्युत सुरक्षा आणि उपकरणांच्या देखभालीसाठी मानक कार्यपद्धती (एसओपी) काटेकोरपणे लागू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच, सर्व एसएनसीयू तसेच एनआयसीयूमध्ये सीसीटीव्ही बसवणे, मॉक ड्रिल अनिवार्य करणे आणि तीन महिन्यांत सर्व सार्वजनिक व खासगी रुग्णालयांचे फायर व इलेक्ट्रिकल ऑडिट पूर्ण करण्याचे सक्त आदेश सर्व जिल्हाधिकारी, मनपा आयुक्त आणि जिल्हा शल्य चिकित्सकांना देण्यात आले आहेत.

या दुर्घटनेच्या वेळी स्वतःचा जीव धोक्यात घालून ३६ बालकांना सुरक्षितपणे बाहेर काढणाऱ्या प्रसंगावधान राखणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा विशेष गौरव केला जाणार असल्याचेही शासनाने स्पष्ट केले आहे.

### कंत्राटदार काळ्या यादीत

» सदोष उपकरणे व सेवा पुरवल्याबद्दल एओव्ही इंटरनॅशनल एलएलपी कंपनीला काळ्या यादीत टाकण्याची कारवाई सुरू झाली आहे. 'शिल्लार' कंपनीलाही काळ्या यादीत टाकण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

### 'अलार्म' त्रासदायक वाटल्याने सिस्टीम केली बंद

» चौकशीदरम्यान एक धक्कादायक बाब समोर आली. रुग्णालयात वारंवार वाजणाऱ्या अलार्ममुळे कामात व्यत्यय येतो म्हणून कर्मचाऱ्यांनी 'फायर अलार्म सिस्टीम' व 'स्प्रिंकलर' बंद (मॅन्युअल मोडवर) करून ठेवले होते. याच बेफिकिरीमुळे २४ ऑगस्टच्या पहाटे भीषण आग लागूनही अलार्म वाजलाच नाही आणि स्प्रिंकलरमधून पाणी मारले गेले नाही.

### चौकशी समितीचे निष्कर्ष

» शिलर कंपनीचे 'ग्राफनेट ॲडव्हान्स' हे व्हेंटिलेटर मुळातच सदोष आणि असुरक्षित होते. त्यात शॉर्टसर्किट होऊन दाब वाढल्याने स्फोट झाला. यापूर्वी २०२२ मध्येही याच कंपनीच्या व्हेंटिलेटरला आग लागली होती, तरीही सुधारणा न करता स्टॅबिलायझरशिवाय उपकरण वापरले गेले. रुग्णालयातील स्मोक डिटेक्टर्स आणि फायर अलार्म सिस्टीम 'मॅन्युअल मोड'वर बंद करून ठेवली होती. त्यामुळे आग लागल्याची सूचना वेळेवर मिळाली नाही. वॉटर स्प्रिंकलर्स सुरू झाले नाहीत आणि फायर पंप हाऊस कुलूपबंद होते. एसएनसीयू कक्षात आपत्कालीन बाहेर पडण्यासाठी एकच दरवाजा होता. फायर एक्झिट नव्हते. उच्च न्यायालयाचे आदेश असूनही या कक्षामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवले नव्हते. बायोमेडिकल उपकरणांच्या देखभालीचे कंत्राट असलेल्या मेसर्स एओव्ही इंटरनॅशनल या कंपनीने व्हेंटिलेटरचे वेळेत मॅपिंग केले नाही व तांत्रिक सल्ला दिलेला नाही.

# मोटर सायकल चोरीचा गुन्हा उघड

### स्थानिक गुन्हे शाखा, अमरावती ग्रामीण यांची कारवाई

प्रतिनिधी १० सप्टेंबर



**अमरावती:** मोटर सायकल चोरीचा गुन्हा उघड केला आहे. स्थानिक गुन्हे शाखा, अमरावती ग्रामीण यांची कारवाई केली आहे. यामध्ये आरोपी नाव - विजय ऊर्फ गजानन प्रभुदास रायबोले वय 23 वर्ष रा. इंदीरा नगर येवदा ता. दर्यापूर जि. अमरावती असे आहे.

निकेतन कदम, पोलीस अधीक्षक, अम ग्रा. यांनी अमरावती ग्रामीण जिल्ह्यात वाढत्या मोटर सायकल चोरीच्या घटनांना आळा घालुन गुन्हेगारीवर प्रभावीपणे नियंत्रण मिळविण्याच्या दृष्टीने स्था.गु.शा. चे अधिकारी व अंमलदार यांना सदर गुन्ह्यांचा समांतर तपास करुन गुन्हे उघडकीस आणण्याबाबत निर्देशीत केले होते.

दिनांक 09/09/2026 रोजी स्थानिक गुन्हे शाखा, अमरावती ग्रामीण चे पथक दर्यापूर अंजनगाव उपविभागात रेकॉर्ड वरील आरोपी चेक करीत असतांना गोपनिय बातमीदारामार्फत खबर मिळाली की, ग्राम येवदा येथे गजानन ऊर्फ विजय प्रभुदास रायबोले नामक व्यक्तीने एक काळ्या रंगाची मोटर सायकल चोरी करुन कोठेतरी लपवून ठेवली आहे. अशा माहिती वरून नमूद आरोपीस ताब्यात घेवून सदर मो सा संबंधाने विचारपूस केली असता त्याने सदर मो सा एक वर्षापूर्वी माहे ऑगस्ट 8/2025 मध्ये ग्राम खुर्माबाद, ता. दर्यापूर येथून चोरी केली व ते मोटर सायकल शासकीय रुग्णालय येवदा येथे ठेवली आहे असे सांगीतले. त्यानुसार आम्ही शासकीय रुग्णालय येवदा येथे जावून पाहणी केली असता तिथे एक काळ्या रंगाची बजाज कंपनीची पल्सर मोटर सायकल अशी उभी दिसली. सदर मोटर सायकल ची पाहणी केली असता सदर मोटर सायकल चा क्रमांक हा एम एच 27 डी बी 476 असा दिसून आला,

अशा आरोपी चे कबुली व मो सा चे वर्णन वरुन पो स्टे खल्लार येथील गुन्हे अभीलेख तपासला असता पो स्टे खल्लार येथे सदर मोटर सायकल चोरी गेल्या संबंधाने अपराध नंबर 133/2025 कलम 303 (2) BNS प्रमाणे दाखल असल्याचे आढळून आल्याने सदर मो सा किं.अं. 85,000/- रु ही नमूद आरोपी कडून जप्त करुन आरोपी व जप्त मोटर सायकल पो.स्टे. खल्लार येथे दाखल करुन सदरचा गुन्हा उघडकीस आणला आहे.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या आदेशाने मा.अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड यांचे मार्गदर्शनात पोलीस निरिक्षक अशोक लांडे, स्थानिक गुन्हे शाखा यांचे नेतृत्वात पो.उपनि. सतिश झाल्टे, पोहवा. मंगेश लकडे, पोहवा. सचिन मसांगे, पोकॉ. हर्षल काळे, चालक पोहवा. हर्षद घुसे यांचे पथकाने केली आहे.

## 15 सप्टेंबर रोजी विभागीय महिला लोकशाही दिन

**अमरावती:** महिला व बालविकास विभागाच्या 4 मार्च 2013 च्या शासन निर्णयानुसार समस्याग्रस्त पिडीत महिलांना त्यांचे प्रश्न मांडण्याकरिता व्यासपीठ मिळावे तसेच त्यांच्या हक्कांचे संरक्षण होवून न्याय मिळावा याद्दष्टीने महिलांच्या तक्रारी/अडचणी शासकीय यंत्रणेकडून सोडवून समाजातील समस्यासग्रस्त, पिडीत महिलांना सुलभ मार्गदर्शनाची सुविधा उपलब्ध व्हावी, यासाठी एक प्रभावी उपाययोजना म्हणून महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते.

त्यानुसार येत्या मंगळवारी दि. 15 सप्टेंबर रोजी विभागीय आयुक्त कार्यालयात सकाळी 11 वाजता विभागीय महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे.

# चांदूर रेल्वे - शेगाव बस सेवा 16 सप्टेंबरपासून सुरु!

### परिवहन मंत्री प्रतापरावजी सरनाईक यांच्याकडून मंजुरी; शुभम परळीकर यांच्या पाठपुराव्याला यश

प्रतिनिधी १० सप्टेंबर

**चांदूर रेल्वे / नांदगाव खंडेश्वर:** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या अमरावती विभागीय कार्यालयाकडून प्रवाशांच्या सोयीसाठी चांदूर रेल्वे - नांदगाव खंडेश्वर - मंगरुळ चव्हाळा - कारंजा लाड- मूर्तिजापूर- अकोला - शेगाव या नवीन बस फेरीला अधिकृत मंजुरी देण्यात आली आहे. राज्याचे परिवहन मंत्री मा. प्रतापरावजी सरनाईक साहेब यांनी या नवीन बस मार्गाला विशेष मंजुरी दिली असून ही सेवा १६ सप्टेंबर २०२६ पासून सुरू होत आहे.

शुभम परळीकर यांच्या सातत्यपूर्ण आढाव्यामुळे यश धामणगाव रेल्वे विधानसभा मतदारसंघाचे आमदार मा. प्रताप अडसड यांच्या मार्गदर्शनात युवा सेना अमरावती उपजिल्हाप्रमुख मा. शुभम मो. परळीकर यांनी या बस सेवेसाठी परिवहन मंत्री प्रतापरावजी सरनाईक यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. शुभम परळीकर यांनी वेळोवेळी या कामाचा आढावा घेत प्रशासकीय अडचणी दूर केल्या, ज्यामुळे ही बस सेवा तातडीने सुरू होत आहे.



**परिसरातील भाविक व प्रवाशांना मोठा दिलासा..**

या बसमुळे नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील सर्व नागरिकांना कारंजा लाड, मूर्तीजापूर, अकोला आणि शेगाव येथे जाण्यासाठी पहिल्यांदाच थेट गाडी उपलब्ध होत आहे. विशेषतः शेगाव येथे संत गजानन महाराजांच्या दर्शनासाठी जाणाऱ्या भाविक भक्तांसाठी ही बस सेवा अत्यंत सोयीची ठरणार आहे.

बस थांबे: चांदुर रेल्वे, पळसमंडळ, राजुरा, नांदगाव खंडेश्वर, शिवनी रसूलापुर, शिंगणापूर फाटा, मंगरूळ चव्हाळा, सालोड, पिंपळगाव निपाणी,दोनद, कारंजा लाड, खेरडा,मूर्तिजापूर, अकोला, बाळापूर,व शेवटी शेगाव असे एकूण 16 थांबे देण्यात आले आहे

# महात्मा जोतिराव फुले महसूल लोक अदालत अभियाना'चा कार्यक्रम जाहीर

### प्रलंबित महसुली दावे तडजोडीने मिटवण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन

प्रतिनिधी १० सप्टेंबर

**अमरावती:** 'महात्मा जोतिराव फुले महसूल लोक अदालत अभियानां'तर्गत जिल्ह्यातील विविध महसूल न्यायालयांमध्ये प्रलंबित असलेले जमिनीशी संबंधित महसुली दावे तडजोडीने व आपापसांतील सहमतीने कायमस्वरूपी निकाली काढले जाणार आहेत. या अभियानाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी व तहसिलदार यांनी महसूल अदालत घेण्याबाबतचा कालबद्ध कार्यक्रम जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी जाहीर केला असून या अभियानाचा लाभ घेत प्रलंबित महसुली दावे तडजोडीने मिटविण्याचे आवाहनही त्यांनी केले आहे.

समाजातील शेवटच्या घटकांपर्यत न्याय आणि हक्क पोहोचवणे हे क्रांतीसूर्य महात्मा जोतिराव फुले यांच्या विचाराचे मूळ सूत्र होते. शेतकऱ्यांसाठी त्यांनी केलेले कार्य दिशादर्शक व अमीट आहे. म्हणूनच त्यांच्या द्विशताद्बी जयंती वर्षाचे औचित्य साधून महसूल विभागातर्फे 1 सप्टेंबर 2026 ते 31 मार्च 2027 या कालावधीत राज्यभरात 'महात्मा जोतिराव फुले महसूल लोक अदालत अभियान' राबविण्यात येत आहे. अमरावती जिल्ह्यातही हे अभियान राबविण्यात येणार असून महसूल प्रशासनातील अर्धन्यायिक न्यायालयांमध्ये जमिनीशी संबंधित दाखल महसूली दावे निकाली काढण्यासाठी विधी सेवा प्राधिकरणाच्या लोक अदालतीच्या धर्तीवर महसूल अदालती आयोजित करण्यात येणार आहेत.या अदालतींचा कालबद्ध कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. अपर जिल्हाधिकारी हे जिल्ह्यात एकूण चार ठिकाणी महसूल अदालती घेणार आहेत. यानुसार अमरावती येथे अपर जिल्हाधिकारी कार्यालयात 7 ऑक्टोबर आणि 9 डिसेंबर 2026 रोजी अमरावती,चांदूर रेल्वे,धामनगाव रेल्वे,नांदगाव खंडेश्वर,तिवसा आणि भातकुली तालुक्यांसाठी महसूल अदालतीचे आयोजन करण्यात येणार आहे.

# रविवारी आदिशक्ती साहित्य संमेलन

### अध्यक्ष डॉ.श्रीकांत पाटील उद्‌घाटक डॉ सतीश तराळ प्रमुख अतिथी खासदार बोंडे



प्रतिनिधी १० सप्टेंबर

**अमरावती:** आदिशक्ती बहुउद्देशीय संस्था अमरावती यांच्याद्वारे तिसऱ्या साहित्य संमेलनाचे आयोजन रविवार दिनांक १३ सप्टेंबर रोजी करण्यात आले आहे. मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी कोल्हापूरचे प्रसिद्ध कादंबरीकार डॉ. श्रीकांत पाटील यांची निवड झाली असून संमेलनाचे उद्‌घाटन ज्येष्ठ साहित्यिक जगद्गुरु तुकोबाराय साहित्य परिषदेचे राज्याध्यक्ष डॉ. सतीश तराळ करणार आहेत. प्रमुख अतिथी म्हणून खासदार अनिल बोंडे उपस्थित राहणार आहेत. संमेलनाच्या स्वागताध्यक्ष प्राचार्य डॉ. स्मिता देशमुख आहेत.

साहित्य संमेलनाचे उद्‌घाटन रविवार दिनांक १३ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी दहा वाजता होणार आहे त्यापूर्वी ग्रंथ दिंडी निघेल. या संमेलनाचे आयोजन अखिल भारतीय कुणबी मराठा क्षत्रिय महासंघ व मराठी विभाग मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालय यांच्या सहकार्याने आदिशक्ती बहुउद्देशीय संस्था अमरावतीच्या अध्यक्ष डॉ. शोभा गायकवाड यांनी केले आहे. या संमेलनात अतिथी म्हणून डॉ. अशोक पाटील इस्लामपूर, प्रा. डॉ. विलास आंबेकर अहमदनगर, समाजभूषण श्री प्रमोद पाटील ठोंबरे पुणे ,श्री पंढरीनाथ बोकारे वरिष्ठ पत्रकार नांदेड, श्री किसन परशराम बोंद्रे ठाणे व समाजसेवक सुदर्शनजी गांग अमरावती, प्रा डॉ सौ स्मिता दिनेश सूर्यवंशी नगरसेविका मनपा अमरावती.हे उपस्थित राहणार आहेत.

# जुन्या वाहनांना हाय सिक्युरिटी नंबर प्लेट अनिवार्य

### दंडात्मक कारवाईसह परिवहन विभागाची कामे बंद होणार

प्रतिनिधी १० सप्टेंबर

**अमरावती:** प्रादेशिक परिवहन कार्यालयाद्वारे दि. 1 एप्रिल 2019 पूर्वी नोंदणी झालेल्या सर्व जुन्या वाहनांवर उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी बसवणे अनिवार्य करण्यात आले आहे. एचएसआरपी बसविली नसल्यास दंडात्मक कारवाईसह परिवहन विभागाची कामे बंद होणार आहे.

केंद्र सरकारच्या केंद्रीय मोटार वाहन नियम 1989 च्या नियम 50 नुसार हा निर्णय घेण्यात आला आहे. जुन्या वाहनांवर एचएसआरपी बसवण्यासाठी शासनाकडून दि. 30 जूनपर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. ही मुदत संपल्यामुळे वाहनधारकांनी किंवा शासकीय कार्यालयांनी अद्याप नंबर प्लेट बसवलेली नाही अथवा अपॉइंटमेंट घेतलेली नाही, अशा वाहनांवर दि. 1 जुलैपासून कारवाईचे निर्देश देण्यात आले आहे. वायुवेग पथकाद्वारे 1 जुलैपासून मोटार वाहन अधिनियमातील नियम 50 व कलम 177 नुसार थेट कारवाई केली जाणार आहे. तसेच एचएसआरपी बसविलेली नाही अशा वाहनांची परिवहन विभागाद्वारे कामे पूर्णपणे थांबवली जातील. यात वाहन हस्तांतरण, नोंदणी प्रमाणपत्रात बदल, फायनान्सचा बोझा चढवणे किंवा उतरवणे, ना-हरकत प्रमाणपत्र जारी करणे, दुय्यम नोंदणी प्रमाणपत्र देणे यांचा समावेश राहणार आहे.

# सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल येथे मेट्रो ब्लड बँक व वैद्यकीय उपकरणांसाठी 9 कोटी मंजूर

### आमदार सुलभा खोडके यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांची फलश्रुती

प्रतिनिधी १० सप्टेंबर



**अमरावती:** विभागातील पाचही जिल्हातील रुग्णांसाठी आरोग्य वरदान ठरलेल्या विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय,अमरावतीच्या आरोग्य सुविधांमध्ये आता अत्याधुनिक मेट्रो ब्लड बँकेची नव्याने भर पडणार आहे. या संदर्भात अमरावतीच्या आमदार .सुलभा खोडके यांनी शासनाकडे पाठपुरावा केल्याने नियोजन विभागाकडून सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल,अमरावती मध्ये अत्याधुनिक मेट्रो ब्लड बँकेच्या सुविधेसह इतरही युनिट मधील वैद्यकीय साहित्य व अत्याधुनिक उपकरणांसाठी ९ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

राज्यात अमरावती आणि नाशिक या दोन जिल्ह्यामध्ये सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल सुरु असून अमरावती मधील सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल मध्ये किडनी रोग, किडनी प्रत्यारोपण, प्लास्टिक सर्जरी, पेडियाट्रिक्स सर्जरी, कार्डियाक युनिक, कँसर युनिट व मेंदूरोग सारखे युनिट सुरु आहे. त्यामुळे केवळ अमरावती विभागच नाही तर ग्रामीण भाग, धारणी -मेळघाट सारखा दुर्गम भाग तसेच मध्यप्रदेशाच्या सीमाभागांतून सुद्धा रुग्ण उपचारासाठी दाखल होत असल्याने या ठिकाणी रुग्ण संख्येचा डोलारा दिवसेंदिवस वाढतच आहे.

रुग्णसेवेला केंद्रबिंदू मानून व त्यांच्या उपचाराला सर्वोच्च प्राधान्य देऊन रुग्णांना आरोग्याच्या सर्व अत्याधुनिक उपचार सेवा-सुविधा उपलब्ध करण्याला घेऊन आमदार सुलभाताई खोडके यांनी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल प्रशासनासोबत संवाद व समन्वय साधून वारंवार बैठका घेत उपाययोजना करण्यावर भर दिला आहे. दरम्यान सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये जवळपास ७-८ युनिट सुरु असतांना सुद्धा त्या ठिकाणी रक्तपेढी उपलब्ध नसल्याने शल्यक्रिया करतांना रुग्णांकरिता इतर रुग्णालयातील रक्तपेढीतून रक्त उपलब्ध करावे लागत आहे. हि बाबत प्रकर्षाने समोर आल्याने सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये अत्याधुनिक ब्लड बँक स्थापन करण्यासंदर्भात आमदार - सौ. सुलभाताई खोडके यांच्या वतीने सूचना करण्यात आली असता रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक - डॉ. अमोल नरोटे यांनी तसा प्रस्ताव जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय,अमरावती मार्फत शासनाकडे पाठविण्यात आला.

# गणेशोत्सवात डीजे, बेन्जो आवाजावर पोलिसांची करडी नजर

### लेझर लाईटवर बंदी, नियम मोडल्यास होणार कडक कारवाई

प्रतिनिधी १० सप्टेंबर



**अमरावती:** आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर अमरावती शहर पोलीस प्रशासनाने ध्वनी प्रदूषण आणि सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत कठोर पावले उचलली आहेत. शहरात गणेश विसर्जन व मिरवणुकांदरम्यान डीजे आणि बेन्जो चालकांसाठी कडक नियमावली लागू करण्यात आली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांचे तंतोतंत पालन करण्याचे स्पष्ट आदेश अमरावती पोलिसांनी दिले आहेत.

पोलीस आयुक्तालयाकडून राजापेठ पोलीस ठाणे आणि पोलीस आयुक्तालय येथे डीजे आणि बेन्जो चालक, मालक यांची बैठक पार पडली. या बैठकांना पोलीस उपायुक्त यशवंत सोळंके, शाम घुगे, पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत मिरवणुकीदरम्यान डोळ्यांना व आरोग्यास धोकादायक ठरणारे लेझर लाईट आणि प्लाझ्मा लाईट वापरण्यास पूर्णपणे मनाई करण्यात आली असल्याची माहिती देण्यात आली. तसेच वाद्य वाजवताना केवळ 'दोन बेस व दोन टॉप' लावण्याचीच परवानगी राहणार आहे. यामुळे लहान मुले, वृद्ध नागरिक आणि आजारी व्यक्तींना ध्वनी प्रदूषणाचा त्रास होणार नाही. सर्वोच्च न्यायालयाच्या आणि ध्वनी प्रदूषण नियमांचे उल्लंघन करणाऱ्या डीजे व बेन्जो चालक, मालकांवर प्रचलित कायद्यानुसार कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल.

बैठकीला उपस्थित असलेल्या सर्व डीजे आणि बेन्जो चालक, मालकांनी लेझर व प्लाझ्मा लाईट लावण्यात येऊ नये आणि दोन बेस-दोन टॉपच्या नियमाचे पालन करून सहकार्य करण्याचे मान्य केले.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

गुरूवार दि. १० सप्टेंबर २०२६ http://epaper.citynewssuperfast.com




# ५६ वर्षीय शिक्षकाची माणुसकी लाचार, १४ चिमुकल्या मुलीसोबत लैंगिक अत्याचार!

## *नराधम दिलीप बोरकर याने वयाचाही नाही केला विचार * काटा जि.प.शाळेतील प्रकार

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •





शिक्षणाचे पवित्र मंदिर मानल्या जाणाऱ्या शाळेतच एका ५६ वर्षीय दिलीप बोरकर नावाच्या शिक्षकाने गुरू-शिष्याच्या नात्याला काळिमा फासणारी अत्यंत धक्कादायक व संतापजनक घटना समोर आली आहे.

वाशिम तालुक्यातील काटा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील ५६ वर्षीय नराधम शिक्षक दिलीप बोरकर यांने तिसरी व चौथीतील तब्बल १४ अल्पवयीन विद्यार्थिनींवर गेल्या ७ ते ८ महिन्यांपासून अश्लील चाळे व लैंगिक अत्याचार केल्याची चीड आणणारी बाब उघडकीस आली आहे. या घटनेमुळे संपूर्ण पालक वर्गात संतापाची लाट उसळली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पहिली ते चौथीपर्यंत असलेल्या काटा जिल्हा परिषद शाळेत दोन शिक्षक आणि दोन शिक्षिका कार्यरत आहेत. यातील ५६ वर्षीय आरोपी शिक्षक गेल्या सात ते आठ महिन्यांपासून तिसरी आणि चौथीतील निष्पाप चिमुकल्या मुलींना मांडीवर बसवून स्वतःच्या मोबाईलवर यूट्यूबवरील अश्लील व्हिडिओ दाखवत असे. एवढेच नव्हे तर मुलींच्या शरीराला अयोग्य स्पर्श करून लैंगिक अत्याचार करत होता. 'घरी किंवा कोणालाही सांगितल्यास शाळेत येऊ देणार नाही,' अशी भीती व धमकी देऊन या नराधमाने चिमुकल्यांची तोंडे बंद ठेवली होते. ८ सप्टेंबर रोजी दुपारी शाळा सुटल्यानंतर एक शिक्षिका घरी जात असताना काही चिमुकल्या मुली त्यांच्याजवळ जाऊन ढसाढसा रडू लागल्या. 'मॅडम, प्लीज आम्हाला सोडून जाऊ नका,' अशी विनवणी करत घाबरलेल्या मुलींनी रडण्यास सुरुवात केली. शिक्षिकेने संशय आल्यावर मुलींना प्रेमाने विश्वासात घेऊन विचारपूस केली असता, मुलींनी त्या नराधम शिक्षकाच्या सर्व भयानक कृत्यांचा पाढा वाचला. ही माहिती ऐकून सुन्न झालेल्या शिक्षिकेने तात्काळ पालकांना आणि जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांना याची माहिती दिली.घटना उघडकीस येताच गावात वाऱ्यासारखी बातमी पसरली. संतप्त पालकांनी आपल्या मुलींकडे विचारणा केली असता, नराधम शिक्षकाच्या धमकीमुळे मुली किती दहशतीखाली होत्या हे समोर आले. निष्पाप मुलींसोबत झालेल्या या घाणेरड्या कृत्यामुळे ग्रामस्थांचा संयम सुटला आणि त्यांनी आरोपी शिक्षकाला पकडून चांगलाच चोप दिला.घटनेचे गांभीर्य ओळखून वाशिम ग्रामीण पोलीस ठाण्याच्या ठाणेदार श्रीदेवी पाटील यांनी आपल्या पथकासह तात्काळ काटा येथील शाळेला भेट दिली आणि आरोपी शिक्षकाला ताब्यात घेतले. ठाणेदार श्रीदेवी पाटील यांनी स्वतः शाळेत जाऊन पीडित मुली, त्यांचे पालक आणि इतर शिक्षक-शिक्षिकांशी सखोल चौकशी केली. यात तब्बल १४ पीडित चिमुकल्यांनी आपल्यावर झालेला अत्याचार पोलिसांसमोर कथन केला. पोलिसांकडून या सर्व १४ मुलींचे जबाब 'इन कॅमेरा' नोंदवण्यात आले आहेत. याप्रकरणी वाशिम ग्रामीण पोलीस ठाण्यात पोक्सो (इ्घ्एध) व इतर गंभीर कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तहसीलदार मॅडम...



# 'रिल्स स्टार' नव्हे; तर 'रियल स्टार' बना !

## रिल्स मुळे नव्हे तर तहसील कार्यालयातील दलाच्या वसुलीमुळे जनता हैराण

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •


आर्थिक देवाण-घेवाणीतून कामाचा भार...
तहसीलदार बनल्या 'रिल्स स्टार'!
कार्यालयातच रील शूट करून शासकीय नियमांना पायदळी तुडवत 'चमकोगिरी'
प्रत्येक कामासाठी आर्थिकतेचे अवलंबन,
सर्व प्रकरणाची चौकशी करून करा निलं...
शासकीय खुर्चीवर बसून शासनाच्या आदेशाला केराची टोपली * रिल स्टार तहसीलदाराची रा...

चांगले काम करणारे अधिकारी जनतेच्या मनात स्थान निर्माण करतात. जनताही त्यांच्यासाठी वेळ प्रसंगी रस्त्यावर उतरते. आणि ते जनतेच्या मनातील रियल स्टार बनतात. रिसोड तहसील कार्यालयातील दलालाच्या वसुलीमुळे जनता त्रस्त झाली आहे. त्यामुळे रील ऐवजी तहसील कार्यालय दलालाच्या वसुली मुक्त करून रियल स्टार बनण्याची गरज आहे.




संविधानाने दिलेल्या अधिकाराचा योग्यरित्या वापर करून सर्वसामान्यांना न्याय देण्याचे तहसीलदाराचे कार्य आहे.तसेच महसूल विभागाचा कारभार सांभाळत असताना प्रशासनाने तहसीलदाराला तालुका दंडाधिकारी म्हणूनही अधिकार प्रदान केले आहेत.तालुका दंडाधिकारी म्हणजेच न्यायदानाचे कार्य सुद्धा तहसीलदाराकडे प्राप्त झालेले आहे.आपल्या पदाची प्रतिष्ठा सांभाळण्याचीसुद्धा जबाबदारी प्रत्येक अधिकात्याची असते.परंतु शासकीय कार्यालयात काढलेल्या आणि सोशल मिडीयावर गाजलेल्या रिसोडच्या तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांच्या एका रिल्स ने त्यांच्या प्रशासकीय कामकाजावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले असली तरीही रिलीज मुळे नव्हे तर तहसील कार्याल तील दलालाच्या वसुलीमुळे नागरिक हैराण झाले आहेत. रिसोड तहसील कार्यालयात तहसीलदार म्हणून प्रतीक्षा तेजनकर रूजू झाल्यात तेव्हा रिसोडच्या प्रसार माध्यमांसह ईलेक्ट्रॉनिक मिडीयाने सुद्धा त्यांच्या कार्याचे कौतुक करून त्यांना कौतुकाच्या शिखरावर नेवून बसविले होते. आपल्यावर होत असलेल्या कौतुकाच्या वर्षावाने तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांना अगणित आनंद झाला.आणि या झालेल्या अगणित आनंदानेच त्यांच्या कार्यालयात दलालांचा सुळसुळाट वाढल्याचे वास्तव आहे. दलालांसोबतच त्यांच्या कार्यालयातील नायब तहसीलदार, अव्वल कारकुन, लिपीक, पुरवठा विभागातील अधिकारी यांच्या मिलीभगताने रिसोड तहसील कार्यालयातील गैरप्रकाराला चालना मिळाली. आपल्या हातून अनेकांवर अन्याय होत असल्याचे चित्र स्पष्ट असतांनाही 'त्यांनी' गांधारीची भूमिका निभावून काळ्याबाजाराला प्रोत्साहन देवून सर्वांना मालामाल केल्याची चर्चा उघडकीस आली. संविधानाने दिलेल्या अधिकाराचा योग्य प्रकारे वापर करून सर्वसामान्यांना न्याय देवूनही तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर महसूल प्रशासनाची, शासनाची आणि स्वत:ची प्रतिमा उंचावण्याचे कार्य करू शकत होत्या.परंतु दलालाच्या संगतीने त्यांनी त्यांची व शासनाची प्रतिमा मलीन करून अनेकांवर अन्याय केल्याच्या घटना उघडकीस आल्या आहेत. आतातरी त्यांनी रिल्स ला प्राधान्य न देता आपल्या कर्तव्याचे पालन करून रियल स्टार बनण्यासाठी पुढाकार घेण्याची गरज आहे.

# थोडक्यात

## जिल्हास्तरीय बुद्धबळ स्पर्धेसाठी वाशीमची मोक्षदा व रिधीका पात्र



**वाशीम :** क्रीडा व युवा सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय वाशिम यांच्याद्वारे आयोजित तालुकास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेमध्ये स्थानिक एस एम सी इंग्लिश स्कूल वाशिम शाळेने १४ वर्षा खालील मुली वयोगटांमध्ये सहभागी होऊन कु. मोक्षदा चांदजकर प्रथम व द्वितीय क्रमांक रिधिका मोरे हिने मिळवीला असून याची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. त्यांच्या या यशासाठीसप्राचार्य मीना उबगडे यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेचे क्रीडा शिक्षक युवराज कुसळकर यांचे मार्गदर्शन लाभले. विजयी खेळाडूंचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

## राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी विजय भड यांची निवड

• सिटी न्युज ब्युरो @ कारंजा •



कारंजा तालुक्यातील शिक्षण क्षेत्रासाठी अभिमानाची बाब म्हणजे श्री बाबासाहेब धाबेकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, काकडशिवणी (पूर्वी यावर्डी) येथील प्राचार्य/ मुख्याध्यापक विजय देविदास भड यांची महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस शिक्षक सेलतर्फे दिल्या जाणाऱ्या राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६ साठी निवड करण्यात आली आहे.

शिक्षण क्षेत्रात अनेक वर्षांपासून उल्लेखनीय कार्य करत असलेल्या विजय देविदास भड यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी, गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी तसेच सामाजिक बांधिलकी जपत आदर्श शिक्षक म्हणून आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक व संघटनात्मक कार्याची दखल घेऊन या प्रतिष्ठेच्या पुरस्कारासाठी त्यांची निवड करण्यात आली आहे.या पुरस्काराचा सन्मान सोहळा दि.१२ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी १२.१५ वाजता स्वयंभू महादेव रिसॉर्ट,अंत्री मलकापूर,ता.बाळापूर,जि. अकोला येथे आयोजित करण्यात आला आहे.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष मा.हर्षवर्धन सपकाळ हे राहणार असून माजी मंत्री मा.विजय वडेट्टीवार यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

विजय भड यांच्या या यशाबद्दल शिक्षण क्षेत्रातील सहकारी,विद्यार्थी,पालक व विविध सामाजिक संघटनांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून,त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.

## श्रीगणेशा आरोग्याचा राज्यभर भक्तांची मोफत आरोग्य तपासणी

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •



श्रीगणेशोत्सवात भक्तांच्या आरोग्याची काळजी घेत मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या पुढाकाराने राज्यभर सुमारे २० हजार मोफत आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत. सार्वजनिक गणेश मंडळांच्या मंडपांपासून महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायत तसेच ग्रामीण भागापर्यंत ही सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या 'श्रीगणेशा आरोग्याचा' उपक्रमाचे हे दुसरे वर्ष आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या पुढाकाराने सार्वजनिक आरोग्य विभाग सुमारे १० हजार सार्वजनिक गणेश मंडळे, शासकीय व निमशासकीय यंत्रणा, सामाजिक संस्था आणि दात्यांच्या सहभागातून हा उपक्रम राबविण्यात येत आहे. यंदा राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यांत उपक्रमाची व्याप्ती वाढविण्यात आली असून नागरिकांना त्यांच्या परिसरातच मोफत आरोग्य तपासणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

# अधिकारी- ठेकेदार पैशासाठी लाचार काटा-किन्हीराजा रस्त्यात भ्रष्टाचार!

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •



वाशिम - काटा-किन्हीराजा रस्त्याचे सुरू असलेले काम निकृष्ट दर्जाचे असल्याचा आरोप करीत कामाची तातडीने पाहणी करून तांत्रिक व गुणवत्ता तपासणी करावी, अशी मागणी काटा व परिसरातील नागरिकांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

या निवेदनात रस्त्याच्या कामाच्या ठिकाणी कंत्राटदाराचे नाव, कामाची किंमत, मंजूर अंदाजपत्रक, रस्त्याची लांबी-रुंदी व कामाचा कालावधी दर्शविणारा अधिकृत माहिती फलक लावण्यात आलेला नसल्याचे नमूद करण्यात आले आहे. तसेच कामामध्ये मोठ्या प्रमाणात काळी माती वापरली जात असल्याचे निदर्शनास येत असून, ही माती रस्त्याच्या कामासाठी तांत्रिकदृष्ट्या योग्य आहे किंवा नाही, याची स्वतंत्र तपासणी करण्याची मागणी करण्यात आली आहे.कामाच्या ठिकाणी संबंधित व्यक्ती नागरिकांशी मुजोरीने व अरेरावीने वागत असल्याच्या तक्रारीही निवेदनात करण्यात आल्या आहेत. याशिवाय ट्रक व इतर अवजड वाहने बेदरकारपणे चालविल्याने नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होत असल्याने कामाच्या ठिकाणी सुरक्षा व्यवस्था व वाहतूक नियंत्रण करण्याची मागणी करण्यात आली आहे.रस्त्याच्या कामाची प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून तांत्रिक व गुणवत्ता तपासणी करावी, कामासाठी मंजूर रक्कम, अंदाजपत्रक, रस्त्याची लांबी-रुंदी व कालावधीची माहिती सार्वजनिक करावी, अधिकृत माहिती फलक लावण्याचे आदेश द्यावेत, तसेच काळी माती व इतर साहित्याची गुणवत्ता तपासावी, अशा विविध मागण्या करण्यात आल्या आहेत. कामात अनियमितता

### कामाच्या ठिकाणी माहिती फलक नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी; काळ्या मातीचा वापर

अथवा निकृष्ट दर्जाचे काम आढळल्यास संबंधितांवर नियमानुसार कारवाई करावी व चौकशीचा अहवाल लेखी स्वरूपात देण्यात यावा, अशी मागणीही करण्यात आली आहे.या निवेदनावर मुख्य अर्जदार अंबादास (बाला) पंढरी सौदागर यांच्यासह गणेश नारायणराव देशमुख, जगदीश भास्करराव देशमुख, विनय बालासाहेब जाधव, अजय शंकर जाधव, गोपाळ प्रल्हाद साखरे , विजय विनायकराव देशमुख, नागेश मधुकर देवकर ओम सुधाकर लोंढे, रे विठ्ठल अशोक बोरकर सूमीत ज्ञानराव देशमुख व इतर नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# नशामुक्त वाशिमसाठी सर्वांनी सक्रिय सहभाग द्यावा -जिल्हाधिकारी

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •



अमली पदार्थांचे सेवन आणि तस्करी ही केवळ कायदा-सुव्यवस्थेची बाब नसून त्याचे सामाजिक आणि कौटुंबिक परिणामही गंभीर आहेत. त्यामुळे अमली पदार्थांच्या दुष्परिणामांबाबत युवक, विद्यार्थी आणि पालकांमध्ये सातत्याने जनजागृती करणे आवश्यक आहे. अमली पदार्थांची विक्री, तस्करी किंवा सेवनाबाबत माहिती मिळाल्यास नागरिकांनी ती तातडीने प्रशासन किंवा पोलिसांना द्यावी. नशामुक्त आणि सुरक्षित वाशिम घडविण्यासाठी प्रशासनासोबत प्रत्येक नागरिकाने सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले.

जिल्हास्तरीय अमली पदार्थ समन्वय समितीच्या (एनकॉर्ड) बैठकीत जिल्हाधिकारी कुंभेजकर बोलत होते. यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक निकेश खाटमोडे पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. बैठकीत जिल्ह्यातील अमली पदार्थविरोधी अभियानाची सद्यस्थिती, करण्यात आलेली कारवाई आणि आगामी उपक्रमांचा आढावा घेण्यात आला. या अभियानाबाबतची माहिती जिल्हा पोलीस अधीक्षक यांनी सादर केली. अमली पदार्थांच्या दुष्परिणामांपासून विद्यार्थ्यांना दूर ठेवण्यासाठी जिल्ह्यातील सर्व १३ पोलीस ठाण्यांच्या हद्दीत इयत्ता आठवी ते बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी विशेष नशामुक्ती कार्यशाळा आणि मार्गदर्शन सत्रे आयोजित करण्यात आली आहेत.

# सणाला गावी जाण्यावरून वाद पत्नीवर चाकूहल्ला !

**मालेगावातील गाडगे नगरातील घटना**

• सिटी न्युज ब्युरो @ मालेगाव •

महालक्ष्मी सणासाठी मूळ गावी जाण्याच्या कारणावरून झालेल्या वादातून पतीने पत्नीवर चाकूने वार केल्याची घटना मंगळवारी (८ सप्टेंबर) दुपारी १ वाजताच्या सुमारास मालेगाव शहरातील गाडगे नगर येथे घडली. या हल्ल्यात पत्नी गंभीर जखमी झाली असून, तिच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

विजय विठ्ठल दुधाटकर (४०)असे गुन्हा दाखल झालेल्या पतीचे नाव असून, नितु उर्फ राणी विजय दुधाटकर (रा. गाडगे नगर, मालेगाव) असे जखमी पत्नीचे नाव आहे. दोघे गेल्या चार वर्षांपासून गाडगे नगर येथे वास्तव्यास असल्याची माहिती आहे.प्राप्त माहितीनुसार, रिद्धी राहुल विश्वकर्मा (२२) यांनी मालेगाव पोलिस ठाणे, मालेगाव दिलेल्या तक्रारीत नमूद केले आहे की, ८ सप्टेंबर रोजी दुपारी विजय याने पत्नी नितुला महालक्ष्मी सणासाठी मूळ गावी खामगाव येथे जाण्यास सांगितले. मात्र, मुलीला सध्या सुट्या नसल्याने एवढ्या लवकर गावी जाऊन काय करायचे, असे नितु हिने सांगितले. यावरून पती-पत्नीमध्ये वाद झाला. वाद वाढल्यानंतर नितु घराबाहेरील ओसरीवर आली. त्यावेळी विजय याने चाकूने तिच्या पोटावर, पाठीवर, डोक्यावर, कपाळावर, छातीवर आणि डोळ्यावर वार केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. गंभीर जखमी झालेली नितु रक्ताच्या थारोळ्यात पडल्यानंतर विजयने चाकू गेटजवळ टाकून घटनास्थळावरून पलायन केल्याचेही तक्रारीत नमूद आहे.

**हत्येच्या प्रयत्नाचा गुन्हा**

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत जखमी नितुला उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल केले. तिच्या बहिणीच्या तक्रारीवरून मालेगाव पोलिस ठाणे, मालेगाव विजय दुधाटकर याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम १०९ अंतर्गत हत्येच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# वाशीम जिल्हा दुष्काळग्रस्त घोषित करा !

• सिटी न्युज ब्युरो @ कारंजा •

*** आमदार सईताई डहाके यांची मुख्यमंत्री फडणवीसांकडे मागणी**
*** शेतांच्या बांधावर जाऊन घेतला परिस्थितीचा आढावा**



कारंजा तालुक्यासह वाशिम जिल्ह्यात मागील ४५ ते ५० दिवसांपासून पावसाने दडी मारल्याने खरीप हंगामातील सोयाबीन,कपाशी व तूर पिके पाण्याअभावी करपून गेली असून शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे.या पार्श्वभूमीवर कारंजा-मानोरा विधानसभा मतदारसंघाच्या आमदार सई प्रकाश डहाके यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी करण्यासाठी विशेष दौरा केला.८ सप्टेंबर रोजी मानोरा तालुक्यात, तर ९ सप्टेंबर रोजी कारंजा तालुक्यातील विविध गावांमध्ये आमदार सईताई डहाके यांनी थेट शेतशिवारात जाऊन पाहणी केली.यावेळी जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्यासह तहसीलदार,कृषी विभागाचे अधिकारी तसेच संबंधित प्रशासनातील अधिकारी उपस्थित होते.पावसाअभावी पिकांची झालेली अवस्था, शेतकऱ्यांचे नुकसान आणि आगामी रब्बी हंगामासमोरील अडचणी याबाबत त्यांनी शेतकऱ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधून माहिती घेतली.शेतकऱ्यांची गंभीर परिस्थिती लक्षात घेता आमदार सईताई डहाके यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि वाशिम जिल्ह्याचे पालकमंत्री दत्तात्रय भरणे यांना पत्र देऊन वाशिम जिल्हा 'कोरडा दुष्काळग्रस्त' घोषित करण्याची मागणी केली आहे.या पत्रामध्ये शेतकऱ्यांना तातडीने दिलासा देण्यासाठी विविध उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली आहे.वाशिम जिल्हा कोरडा दुष्काळग्रस्त घोषित करावा.एन.डी.आर.एफ.च्या निकषांपेक्षा अधिक मदत देऊन शेतकऱ्यांना झालेल्या उत्पादन खर्चाच्या प्रमाणात आर्थिक मदत द्यावी.पिक विमा काढलेल्या शेतकऱ्यांना २५ टक्के आगाऊ पीक विमा (Mid-Season Adversity) देऊन उर्वरित विम्याची रक्कम तत्काळ जमा करण्याचे आदेश विमा कंपन्यांना द्यावेत.शेतकऱ्यांचे चालू वर्षाचे वीज बिल माफ करून कृषी कर्जाच्या वसुलीस स्थगिती द्यावी.पशुधनासाठी चारा छावण्या अथवा चारा डेपो तातडीने सुरू करावेत.दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांच्या मुलांची शाळा व महाविद्यालयीन फी पूर्णपणे माफ करावी.

आगामी रब्बी हंगामासाठी शेतकऱ्यांना विनापरतावा अग्रिम आर्थिक मदत उपलब्ध करून द्यावी.पावसाअभावी शेतातील उभी पिके करपण्याच्या मार्गावर असून अनेक शेतकऱ्यांसमोर रब्बी हंगामाची पेरणी कशी करायची, हा गंभीर प्रश्नप निर्माण झाला आहे.

# पोळा सणावर कोरड्या दुष्काळाचे सावट !

## *२० दिवसांपासून पावसाची दडी *सोयाबीन पीक करपले *बळीराजाच्या डोळ्यांत अश्रू

• दिपक मापारी @ रिसोड •





ऐन पोळा सणाच्या तोंडावर घोटा, चिखली परिसरातील शेतकऱ्याच्या आनंदावर कोरड्या दुष्काळाचे सावट पसरले आहे. गेल्या सुमारे २० दिवसांपासून पावसाने दडी मारल्याने खरीपाची पिके पाण्याअभावी करपू लागली आहेत. वर्षभर शेतात राबणाऱ्या बैलाचा सण उत्साहात साजरा करण्याची शेतकऱ्यांची इच्छा असली, तरी हातातोंडाशी आलेली पिके डोळ्यांदेखत सुकत असल्याने पोळ्याच्या आनंदीची चिंतत हरवली आहे. जून-जुलैमध्ये झालेल्या पावसामुळे यंदा चांगल्या उत्पादनाची आशा निर्माण झाली होती. त्यामुळे शेतकऱ्यांनी सोयाबीन, कापूस आणि तुरीची मोठ्या अपेक्षेने पेरणी केली. सुरुवातीला पिकांची वाढही चांगली झाली.

**पोळ्याचा उत्साह मावळला...**

पोळा हा शेतकरी आणि बैलांच्या नात्याचा जिव्हाळ्याचा सण. बैलांना सजवून, त्यांची पूजा करून शेतकरी कृतज्ञता व्यक्त करतो. मात्र, यंदा पिकांचे नुकसान आणि वाढता उत्पादन खर्च यामुळे अनेक शेतकऱ्यांच्या हातात पैसे उरलेले नाहीत. त्यामुळे बैलांच्या सजावटीपासून घरातील गोडधोडपर्यंत पोळ्याच्या तयारीवर आर्थिक संकटाची छाया पडली आहे. शेतात हिरवंक दिसण्याच्या दिवसात पिके करपल्याने पावसाच्या वेळी आलेल्या बळीराजाचा सणाचा उत्साह मावळला आहे. समाधानकारक झाली. मात्र, ऑगस्टच्या उत्तरार्धापासून अचानक पाऊस फिरला. पावसाचा मोठा खंड पडल्याने जमिनीतील ओलावा पडला असून, ऐन फुलोरा आणि शेंगा भरण्याच्या अवस्थेतील पिकांना पाण्याची नितांत गरज असताना तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली आहे.पावसाचा खंड वाढत असल्याने पिकाच्या नुकसानीची तातडीने सर्वेक्षण करून पंचनामे करण्याची मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे. महाराष्ट्र आणि कृषी विभागाने प्रत्यक्ष शेतावर जाऊन परिस्थितीची पाहणी करावी, तसेच पीकविमा व शासनाच्या मदतीसाठी आवश्यक कार्यवाही करावी, अशी अपेक्षा आहे.पावसाने आणखी ओढ दिल्यास खरीप हंगाम हातातून जाण्याची भीती शेतकऱ्यांना सतावत आहे.

त्यामुळे शासनाने परिस्थितीचे गांभीर्य ओळखून तातडीने नुकसानीचा आढावा घ्यावा आणि शेतकऱ्यांना मदतीचा हात द्यावा, अशी मागणी शेतकऱ्यांतून होत आहे.

# जमिनीचे सर्व अभिलेख आता एकाच छताखाली !

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

**'महालँडस्टॅक' प्रणालीमुळे सातबारा, फेरफार, मिळकतपत्रिका, नकाशे व जुने रेकॉर्ड एका क्लिकवर उपलब्ध**

जमिनीशी संबंधित विविध कागदपत्रे, दाखले आणि उतारे मिळविण्यासाठी नागरिकांना आता वेगवेगळ्या संकेतस्थळांवर जाण्याची आवश्यकता राहणार नाही. भूमि अभिलेख विभागाने विकसित केलेली 'महालँडस्टॅक' ही एकात्मिक संगणक प्रणाली लवकरच कार्यान्वित होत असून, या प्रणालीद्वारे राज्यातील ग्रामीण व शहरी भागातील तब्बल ४८ कोटी अभिलेख एकाच प्लॅटफॉर्मवर उपलब्ध होणार आहेत. याचा शेतकरी, जमीनमालक, बँक अधिकारी, विधी व्यवसायिक तसेच सर्वसामान्य नागरिकांना मोठा फायदा होणार आहे.

**काय आहे 'महालँडस्टॅक' प्रणाली?**

सध्या सातबारा पाहण्यासाठी एक संकेतस्थळ, फेरफारासाठी दुसरे, तर मोजणीसाठी स्वतंत्र संकेतस्थळ अशा विविध माध्यमांचा वापर नागरिकांना करावा लागतो. ही प्रक्रिया सुलभ करण्यासाठी जमाबंदी आयुक्त तथा संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे शैलेश नवाल यांच्या मार्गदर्शनाखाली 'महालँडस्टॅक' प्रणाली विकसित करण्यात आली आहे. 'महाभूमि' या अधिकृत संकेतस्थळावर 'महालँडस्टॅक'ची स्वतंत्र विंडो उपलब्ध करून देण्यात येणार आहे. नागरिकांना एकदाच लॉग इन करून जमिनीशी संबंधित विविध अभिलेख पाहता तसेच डाउनलोड करता येणार आहेत.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

८

गुरूवार, दि.१० सप्टेंबर २०२६ Web. http://epaper.citynewssuperfast.com

# ऐतिहासिक पालखी व कावड महोत्सवात खिसेकापूंनी भाविकांना केले लक्ष्य!

## दागिने, मोबाईल,पाकिटे आदी गायब,चोरांच्या अटकेसाठी निघाला मोर्चा

प्रतिनिधी १० सप्टेंबर

**अकोला:** शहराच्या ऐतिहासिक पालखी मिरवणुकीदरम्यान लाखो भाविकांची गर्दी उसळली होती. या गर्दीचा लाभ घेत अज्ञात चोरांनी भाविकांना लक्ष्य करून सोन्याचे दागिने, मोबाईल फोन, आणि पॉकेट चोरले. मात्र, पोलिसांनी अद्याप एकाही संशयिताला अटक केलेली नाही. भाविकांच्या गर्दीचा फायदा घेत दागिने व मोबाईल चोरणाऱ्या चोरट्यांना तात्काळ अटक करण्याच्या मागणीसाठी जुने शहर पोलीस स्टेशनवर लोकांनी मोर्चा काढला.

अकोला शहरातील सर्वात मोठा पालखी व कावड महोत्सव, श्रावण महिन्याच्या शेवटच्या सोमवारी संपन्न झाला. अकोला





शहरात १५० हून अधिक भव्य पालख्या आणि मोठमोठ्या कावड निघाल्या. या पालखी महोत्सवात लाखो लोकांनी सामील होत देवाधिदेव महादेवाचे दर्शन घेत आपली मनोकामना पूर्ण केली. तर दुसरीकडे अनेक भक्तांच्या दागिने व मोबाईलवर चोरांनी हात साफ केला. अनेक भक्तांचे, विशेषतः महिलांचे सोन्याचे दागिने, मोबाईल फोन आणि पाकिटे गायब झाली. पालखी उत्सव पाहण्यासाठी अभूतपूर्व गर्दी जमली होती. या गर्दीत चोरांनी धुमाकूळ घातला. शेकडो भक्तांचे मोबाईल फोन, पाकिटे, रोकड आणि दागिने चोरीला गेले. मात्र, पोलिसांनी अद्याप एकाही संशयिताला अटक केलेली नाही. पोलिसांच्या निष्क्रियतेच्या निषेधार्थ, जुन्या शहरातील नागरिकांनी मिरवणुकीत सहभागी झालेल्या लोकांचे दागिने, मोबाईल फोन आणि पाकिटे चोरणाऱ्या चोरांना अटक करण्याची मागणी करत जुने शहर पोलीस स्टेशनवर मोर्चा काढला.

पोलिसांच्या सूत्रांनुसार, पालखी उत्सवातील महिला भक्तांकडून दागिने, मोबाईल फोन आणि पाकिटांच्या चोरीच्या काही घटनांची नोंद झाली आहे.पोलिस सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपींचा शोध घेत आहेत. पालखी उत्सवादरम्यान कडक सुरक्षा व्यवस्था, पोलीस बंदोबस्त आणि तंत्रज्ञानाचा वापर करूनही, या घटनांमुळे गंभीर चिंता निर्माण झाली आहे. अशा गर्दीच्या धार्मिक कार्यक्रमांना उपस्थित राहताना नागरिकांनी सतर्क राहावे आणि आपले मोबाईल फोन, दागिने व मौल्यवान वस्तू सुरक्षित ठेवाव्यात, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# अकोला जिल्हा मजूर संघाला सहकार विभागाचा दणका




प्रतिनिधी १० सप्टेंबर

**अकोला :** सहकार विभागाच्या निर्देशांना केराची टोपली दाखविणाऱ्या अकोला जिल्हा मजूर कामगार सहकारी संस्था संघाविरुद्ध (र.क्र.१०७) प्रशासनाने धडक कारवाई केली आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम ८०(२) अन्वये सहकार विभागाने बुधवार,९ सप्टेंबर रोजी धाड टाकून मजूर संघाचे महत्त्वाचे दप्तर जप्त केले.

या धडक कारवाईमुळे सहकार वर्तुळात प्रचंड खळबळ उडाली आहे. जप्ती कारवाईत प्रोसिडिंग बुक जप्त करता आले नाही ते का करता आले नाही असा प्रश्न विचारला जात आहे.

जिल्ह्यातील श्री साई, छत्रपती, दिलासा, गुरुदत्त, रामकृष्ण आणि संत गजानन या सहा मजूर कामगार सहकारी संस्थांनी सभासदत्वासाठी अर्ज केले होते. मात्र, संघाकडून टाळाटाळ केली जात असल्याने तक्रार दाखल झाली. यावर सहकार विभागाने कलम ७९(१) अन्वये निर्देश देऊनही पूर्तता न झाल्याने कलम ७९(२) नुसार प्राधिकृत अधिकारी नियुक्त करण्यात आले. तरीही व्यवस्थापक आजारी असल्याचे कारण देत दप्तर देण्यास टाळाटाळ करण्यात आल्याने अखेर पोलिसांनी बंदोबस्तात ही जप्तीची कारवाई केली.

सहकार विभागाने 'आय व जे' नमुना नोंदवही, शेअर सर्टिफिकेट आणि २०२५-२६ चे इतिवृत्तांत पुस्तक जप्त केले आहे. मात्र, प्रोसिडिंग बुक आणि पावती पुस्तके गुरुवारी हस्तांतरित करण्याचे आश्वासन मजूर संघाने दिले आहे. सलगच्या या कारवायांमुळे मजूर संघाचे विद्यमान संचालक मंडळ बरखास्त होणार का, या चर्चेला उधाण आले आहे. दप्तराची संपूर्ण छाननी झाल्यानंतर पुढील कठोर प्रशासकीय कारवाईची दिशा स्पष्ट होईल. ६ संस्थांच्या सभासदत्वाचा मार्ग मोकळा -जिल्हा उपनिबंधक गितेशचंद्र साबळे जिल्हा उपनिबंधक गितेशचंद्र साबळे यांनी सांगितले की, 'सहा संस्थांना सभासदत्व नाकारल्याने त्यांच्या कायदेशीर हक्कांच्या संरक्षणासाठी कलम ८० (सी) अंतर्गत कारवाई करण्यात आली. अधीक्षक व प्राधिकृत अधिकारी अनिल मनवर यांनी दप्तर ताब्यात घेतले असून, सभासदत्वाच्या नोंदी पूर्ण करून या सहा संस्थांचे सभासदत्व बहाल केले जाईल.'

### सहा संस्थांना सभासदत्व देण्यात येईल

पुढच्या टप्प्यांमध्ये कारवाईचा मुद्दा होता. सदरची कारवाई ही सहा मजूर सहकारी संस्थांना सभासदत्व नाकारलं होतं त्यांच्या लिगल राईट साठी आपण कलम ८० सीची कारवाई केली. रेकॉर्ड अनिल मनवर यांनी कार्यालयात घेऊन आलेत आणि याचा कारवाई म्हणजे सदर संस्थांच्या सभासदत्व च्या नोंदी अनिल मनवर घेतील आणि ज्या सहा संस्था होत्या ज्यांना मजूर सहकारी संस्थाचे सभासदत्व देण्यात आले नाही त्यांना ते बहाल केल्यानंतर आमची कारवाई पूर्ण होईल.

**गितेशचंद्र साबळे**
जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था, अकोला

# भाजपच्या नगरसेवकावर तलवारीने जीवघेणा हल्ला!

प्रतिनिधी १० सप्टेंबर

**बुलढाणा :** शहरातील राजकीय वातावरण पुन्हा एकदा तापण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. बुलढाणा नगरपालिकेतील भाजपचे नगरसेवक आकाश दळवी यांच्यावर तलवारीने हल्ला करण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोप समोर आला आहे. शहरातील गजबजलेल्या कारंजा चौक परिसरात हा प्रकार घडल्याचे सांगण्यात येत असून, या घटनेनंतर परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले.या प्रकरणी आकाश दळवी यांनी बुलढाणा शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. तक्रारीनुसार, आकाश दळवी यांना काही व्यक्तींनी शिवीगाळ आणि मारहाण केली. त्यानंतर धमकी देत शस्त्र दाखवून दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. तलवारीच्या साहाय्याने हल्ला करण्याचा प्रयत्न झाल्याचेही तक्रारदाराकडून नमूद करण्यात आले आहे. या तक्रारीची दखल घेत पोलिसांनी निखिल शर्मा, वंश शर्मा आणि आर्यन शर्मा यांच्याविरोधात विविध कलमांनुसार गुन्हा दाखल केला आहे.



यंदाच्या पालखी महोत्सवात हरिहर पेठ परिसरातील भोलेश्वर पालखी मंडळांने सर्वांचेच लक्ष वेधून घेतले

# आमदार नितीन देशमुखांवर तीन लोकसभा मतदारसंघांची जबाबदारी

प्रतिनिधी १० सप्टेंबर

**अकोला :** शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी बुधवारी मुंबईत 'मातोश्री'वर आयोजित बैठकीत पक्ष संघटना मजबूत करण्याच्या दृष्टीने प्रमुख नेते व विश्वासू पदाधिकाऱ्यांवर विविध लोकसभा आणि विधानसभा मतदारसंघांची जबाबदारी सोपवली. यामध्ये पक्षाचे उपनेते तथा आमदार नितीन देशमुख यांच्यावर अकोला, अमरावती आणि बुलढाणा या



तीन लोकसभा मतदारसंघांची जबाबदारी देण्यात आली असून, त्यांची संपर्कप्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

माजी केंद्रीय मंत्री तथा खासदार अरविंद सावंत, विनायक राऊत, सुषमा अंधारे यांच्यासह अमरावती, बुलढाणा तसेच राज्यभरातील प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

### संघटना मजबूत करा, काळ आपलाच आहे !

सर्वोच्च न्यायालयात पक्ष आणि चिन्ह संदर्भातील सुरू असलेल्या सुनावणीच्या पृष्ठभूमीवर उद्धव ठाकरे यांनी पदाधिकाऱ्यांना सूचक संदेश दिला. 'येणारा काळ आपलाच आहे,' असा विश्वास व्यक्त करत त्यांनी पक्ष संघटना अधिक मजबूत करण्याचे निर्देश दिले.

# 13 नगरसेवक सह्यांचे पत्र दाखवा, एक लाख न्या; डॉ.जिशान हुसेन यांचे आवाहन

प्रतिनिधी १० सप्टेंबर

**अकोला:** अकोला महानगरपालिकेतील घनकचरा व्यवस्थापनातील कथित गैरव्यवहार व भ्रष्टाचाराचा मुद्दा विरोधी पक्षनेते डॉ. झिशान हुसैन यांनी उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात नेल्याने सत्ताधारी भाजपमध्ये मोठी अस्वस्थता पसरली आहे. या गंभीर भ्रष्टाचारावर थेट उत्तर देण्याऐवजी, भाजप दर दोन-तीन महिन्यांनी विरोधकांमध्ये गैरसमज व संभ्रम निर्माण करून जनतेचे लक्ष विचलित करण्याचा केविलवाणा प्रयत्न



करत असल्याचा घणाघाती आरोप विरोधी पक्षनेता डॉ.जीशान हुसेन यांनी केला आहे. कॉंग्रेस पक्षाच्या १३ नगरसेवकांचे पत्र आपल्याकडे असल्याचा दावा भाजप करत आहे.या दाव्याची हवा काढताना डॉ. हुसैन यांनी सत्ताधाऱ्यांना खुले आव्हान दिले: 'भाजपने १३ नगरसेवकांच्या स्वाक्षरीचे पत्र दाखवावे आणि १ लाख रुपये घेऊन जावे. महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनातील गैरव्यवहारावर न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली असून, अकोलेकरांच्या हिताच्या या न्यायालयीन लढ्यात 'न्यायदेवता' लवकरच योग्य निर्णय देईल, असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला. सत्ताधारी दिशाभूल करण्याचा जितका प्रयत्न करतील, तितकाच त्यांचा भ्रष्टाचाराचा चेहरा उघडा पडेल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# शेतकऱ्यांचे महावितरण कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन



प्रतिनिधी १० सप्टेंबर

**मूर्तिजापूर :** शेतीसाठी दिवसा आठ तास वीजपुरवठा देण्याचे आश्वासन असतानाही प्रत्यक्षात दिवसा एक तासदेखील वीज मिळत नसल्याचा आरोप करत मूर्तिजापूर तालुक्यातील निंबा शिवारातील शेतकरी संतप्त झाले आहेत. विविध मागण्यांसाठी शेतकऱ्यांनी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या मूर्तिजापूर येथील मुख्य कार्यालयासमोर ठिय्या आंदोलनाचा पवित्रा स्वीकारला. शेतीपिकांना पाणी देण्यासाठी वीजपुरवठा अत्यंत महत्त्वाचा असताना परिसरात दिवसा नियमित वीज मिळत नसल्याने शेतकऱ्यांची शेतीची कामे प्रभावित होत असल्याचे आंदोलकांचे म्हणणे आहे. मुख्यमंत्र्यांकडून शेतकऱ्यांना दिवसा आठ तास वीजपुरवठा देण्याचे आश्वासन देण्यात आले असतानाही त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी होत नसल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला.

### लाईनमनच्या अनुपस्थितीचाही आरोप

वीजपुरवठ्याच्या प्रश्नासोबतच परिसरातील विद्युत यंत्रणेच्या देखभाल-दुरुस्तीबाबतही शेतकऱ्यांनी नाराजी व्यक्त केली. विद्युत रोहित्रामध्ये बिघाड झाल्यानंतर संबंधित कर्मचारी अथवा लाईनमन वेळेवर घटनास्थळी पोहोचत नसल्याचा आरोप आंदोलकांनी केला. त्यामुळे बिघाडाची पाहणी आणि दुरुस्तीच्या प्रक्रियेसाठी शेतकऱ्यांनाच मोठी धावपळ करावी लागत असल्याचे त्यांनी सांगितले.

### वीजतार चोरीच्या घटनांमुळेही शेतकरी त्रस्त

निंबा शिवार परिसरात गेल्या काही दिवसांपासून विद्युत तार चोरीच्या घटनाही घडत असल्याचा दावा शेतकऱ्यांनी केला आहे. या घटनांकडे महावितरण प्रशासनाकडून पुरेसे गांभीर्याने पाहिले जात नसल्याचा आरोपही आंदोलकांनी केला. एकीकडे शेतीसाठी पुरेसा वीजपुरवठा मिळत नसताना दुसरीकडे विद्युत यंत्रणेतील बिघाड आणि तार चोरीच्या घटनांमुळे शेतकऱ्यांच्या अडचणी वाढल्या आहेत. त्यामुळे दिवसा नियमित आणि सुरळीत वीजपुरवठा करावा, विद्युत यंत्रणेची देखभाल-दुरुस्ती तातडीने करावी तसेच तार चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली.

# हल्ल्यातील मृतकांच्या वारसांना ५० लाखांची मदत व नोकरी द्या!

## मंत्रालयातील बैठकीत मागणी : अमरावती जिल्ह्यातील सर्व आमदारांची उपस्थिती

प्रतिनिधी १० सप्टेंबर

**अमरावती :** मंत्रालयात पार पडलेल्या बैठकीत नागरिकांच्या जीविताच्या सुरक्षिततेचा प्रश्न प्राधान्याने मांडण्यात आला. तसेच या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या कुटुंबाच्या वारसाला ५० लाख व एकाला नोकरी देण्याच्या मागणीसह वन विभागाच्या विशेष बचाव पथकाद्वारे हल्लेखोर वाघ व बिबट्यांना तातडीने जेरबंद करून त्यांना वडाळी येथील प्राणिसंग्रहालयात सुरक्षितपणे बंदिस्त करण्याची मागणी करण्यात आली. या बैठकीला अमरावती जिल्ह्यातील सर्व आमदारांची उपस्थिती होती.

जिल्ह्यातील सोनोरी, शिरजगाव कसबा, राजुरा, तिवसा तसेच परिसरात वाघ व बिबट्यांच्या वाढत्या हल्ल्यांमुळे निर्माण



झालेल्या गंभीर परिस्थितीवर तातडीने उपाययोजना करण्यासाठी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पुढाकाराने मंत्रालयात महत्त्वपूर्ण बैठक झाली. आमदार रवी राणा यांच्या प्रयत्नाने नामदार वनमंत्री गणेश नाईक यांच्यासोबत झालेल्या या बैठकीला आमदार रवी राणा, आमदार संजय खोडके, आमदार प्रवीण पोटे,आमदार प्रवीण तायडे, आमदार उमेश यावलकर, आमदार प्रताप अडसड, आमदार उमेश यावलकर, आमदार केवलराम काळे, आमदार गजानन लवटे आदी अमरावती जिल्ह्यातील सर्व आमदारांची उपस्थिती होती.

या बैठकीत नागरिकांच्या जीविताच्या सुरक्षिततेचा प्रश्न प्राधान्याने मांडण्यात आला. यावेळी छत्री तलाव येथे प्राणिसंग्रहालय विकसित करण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा, तसेच मेळघाट परिसरात वन्यजीव बचाव, उपचार व सुरक्षित बंदिस्तीकरणासाठी अत्याधुनिक सुविधा, प्रशिक्षित मनुष्यबळ व आवश्यक साधनसामग्री उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी करण्यात आली. या माध्यमातून मानव-वन्यजीव संघर्ष कमी करण्यासोबतच पर्यटनालाही चालना मिळणार असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

दरम्यान, वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात मृत्यू झालेल्या दिनेश उर्फ दामू आवारे, ऊर्मिला ईवने, चरणदास ईखे आणि राजाभाऊ मोरे यांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी ५० लाख रुपयांचे विशेष आर्थिक सहाय्य देण्यात यावे. तसेच प्रत्येक कुटुंबातील एका पात्र सदस्याला वन विभागात शासकीय नोकरी देण्याचा विशेष निर्णय घ्यावा, अशी मागणी आमदार रवी राणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व वन मंत्री यांच्या कडे केली.

### तातडीने प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवा!

वन, पोलीस, महसूल आणि स्थानिक प्रशासनामध्ये प्रभावी समन्वय साधून नागरिकांच्या सुरक्षेसाठी तातडीच्या प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्याचे निर्देश देण्याची मागणीही यावेळी करण्यात आली.

# जागतिक पर्यटन दिनानिमित्त अकोला येथे कृषी पर्यटनाविषयी 28 सप्टेंबरला कार्यशाळा

प्रतिनिधी १० सप्टेंबर

**अमरावती :** जागतिक पर्यटन दिन २७ सप्टेंबर रोजी साजरा केला जातो. या निमित्ताने २८ सप्टेंबर रोजी सकाळी अकोला येथे कृषी पर्यटन विकासाला चालना देण्यासाठी विभागीय स्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन पर्यटन संचालनालयाचे प्रादेशिक उपसंचालक विजय जाधव यांनी केले.

अमरावती येथील नियोजन भवनात यासंदर्भात घेण्यात आलेल्या बैठकीत ते बोलत होते. या बैठकीत उमेद अमरावतीचे जिल्हा व्यवस्थापक रोशन उमक, माविमचे पवन देशमुख, एमसीईडीचे प्रकल्प अधिकारी एस. ए. कादरी, उपसंचालक (माहिती) अनिल आलुरकर अमरावती विभागातील जिल्हा



ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक, महिला आर्थिक विकास महामंडळांचे जिल्हा व्यवस्थापक, शाश्वत विकास केंद्राचे गणेश चौधरी, वेदनंदीनी कृषी पर्यटन केंद्राचे संचालक प्रकाश पोहरे, महेंद्री कृषी पर्यटन केंद्राचे संचालक विजय श्रीराव, कॅनव्हास फाउंडेशनचे अध्यक्ष आशिष शेरेकर, जिल्हा अग्रणी बँकांचे तसेच जिल्हा उद्योग केंद्राचे अधिकारी उपस्थित होते.

अकोला जिल्ह्यातील बार्शीटाकळी तालुक्यातील वेदनंदीनी कृषी पर्यटन केंद्राच्या सहकार्याने ही कार्यशाळा पर्यटन संचालनालय आयोजित करीत आहे. या बैठकीत जागतिक पर्यटन दिनानिमित्त आयोजित करण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांचे नियोजन, महिला बचत गटांचा सहभाग, कृषी व ग्रामीण पर्यटनाला चालना, स्थानिक उत्पादनांचे प्रदर्शन तसेच पर्यटन जनजागृती इत्यादी उपक्रमांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी शाश्वत विकास केंद्र अमरावती यांच्या वतीने प्रकाशित त्रैमासिक बातमी पत्राच्या पुस्तिकेचे विमोचन पर्यटन उपसंचालक विजय जाधव यांच्या हस्ते करण्यात आले.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले.
■ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ■ संपर्क - ०७२४ - २४३५५७३, २४४४७७४ ■ email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135